# ‘‘शुभवर्तमानाचे रक्षक’’

## इंडियन चर्च ऑफ क्राईस्ट

# अनुक्रमणिका


| अ.नं. | अध्याय/पाठ | पान क्र. |
|---|---|---|
| १. | परमेश्वराचा शोध | ०१ |
| २. | परमेश्वर ✻ | ०३ |
| ३. | येशू परमेश्वर आहे ✻ | ०७ |
| ४. | येशूचे शिक्षण ✻ | १० |
| ५. | वचन ✻ | १३ |
| ६. | पाप ✻ | १५ |
| ७. | वधस्तंभ ✻ | १९ |
| ८. | पश्चाताप ✻ | ३२ |
| ९. | बाप्तिस्मा ✻ | ३८ |
| १०. | येशू प्रभु आहे ✻ | ४३ |
| ११. | मंडळी चर्च ✻ | ४८ |
| १२. | किंमत चुकवणे | ५१ |
| १३. | पुनुरूत्थान | ५६ |
| १४. | पवित्र आत्मा | ६० |
| १५. | महान कार्य | ६३ |

## संशोधित शुभवर्तमानाचे रक्षक पाठः

हे शुभवर्तमानाचे संशोधन केलेले रक्षक पाठ आहेत. हया धडयांचा तुम्ही तुमच्या इच्छेनुसार कोणत्याही क्रमामध्ये हयाचा उपयोग करू शकता. कारण आमचा उद्देश हा आहे की, देवाला शोधणाऱ्याला विश्वासाचा मुलभूत पाया जाणून घेण्यासाठी मदत मिळेल. देवाला शोधणाऱ्यांना फक्त ख्रिस्ती बनण्यासाठी हेच पाठ शिकवले जावे असे नाही. त्यांचे मन देवाजवळ वळवण्यासाठी आपल्या आणखी दुसऱ्या वचनांचा उपयोग करण्याची आवश्यकता सुध्दा पडू शकते. हे शिक्षण आपल्या वेगवेगळया शिर्षक असलेले पाठ/धडे आहेत जे त्यांना आपण शिकवत आहोत. त्यांना एकमात्र विस्तारित स्वरूप असेल असेही नाही. भविष्यामध्ये आम्ही हयामध्ये आणखी पाठ सुध्दा वाढवू शकतो.

हया पाठांचा हा एक साधारण क्रम आहे, ज्याचा उपयोग शोधणाऱ्यांना शिकवण्यासाठी केला जाऊ शकतो.

### बाप्तिस्म्याच्या अगोदर पाया घालणारे पाठ

| | पाठ | | उद्देश |
|---|---|---|---|
| १. | परमेश्वराचा शोध | - | देवाला शोधणाऱ्याला गंभीरतेने देवाला शोधण्यासाठी मदत करणे. |
| २. | परमेश्वर | - | वचनांच्या देवाला जाणण्यासाठी देवाला शोधणाऱ्यांना मदत करणे. |
| ३. | येशू परमेश्वर आहे | - | येशूच्या देवपणत्वाबद्दल शिकवण्यासाठी. |
| ४. | येशूचे शिक्षण | - | येशूचे काही शिक्षण आणि दावा केलेल्या बाबींच्या माहितीसाठी. |
| ५. | वचन | - | ख्रिस्ताच्या विश्वासामध्ये मजबूत बनण्यासाठी बायबल का ऐकणे व का वाचणे हयांचे महत्व हया गोष्टीवर भर देण्यासाठी. |

| पाठ | | उद्देश |
|---|---|---|
| ६. पाप | - | शोधणाऱ्यांच्या जीवनामध्ये देवाची आणि त्याच्या क्षमेची किती आवश्यकता आहे हे सांगण्यासाठी. |
| ७. वधस्तंभ | - | आपल्या तारणासाठी वधस्तंभाद्वारे देवाचा अनुग्रहाला/कृपेला जाणण्यासाठी |
| ८. पश्चाताप | - | जसं जसं आपण अनुग्रहाला /कृपेला समजत जातो, त्याच्याबरोबर आत्मिक पश्चातापाची आवश्यकता शिकवण्यासाठी. |
| ९. बाप्तिस्मा | - | हे शिकवण्यासाठी की कसे आपण क्षमा प्राप्त करावी आणि ख्रिस्ती बनावं. |
| १०. येशू प्रभु आहे | - | ज्यांनी येशूवरती आपला विश्वास आणला आहे त्यांना हे शिकवण्यासाठी की येशूच्या मागे चालण्याचा खरा अर्थ काय आहे. |
| ११. मंडळी/चर्च | - | नवीन विश्वासू मंडळीसाठी देवाच्या योजनाबद्दल शिकावे यासाठी की त्यांनी विश्वासामध्ये कायम राहून त्याचा उपयोग करावा. |
| १२. किंमत चुकवणे | - | नवीन विश्वासू असणाऱ्यांना येशूच्या शिष्याच्या स्वरूपात एक संकल्पित जीवन जगण्यासाठी शिकवणे. |

✻ चा अर्थ - सर्वांसाठी आवश्यक

चा अर्थ - ख्रिस्ती नसलेल्यासाठी केले जाणारे आवश्यक पाठ

चा अर्थ - हे धडे ख्रिस्ती कुटूंबामधून आलेल्या व्यक्तीसाठी पाप च्या अगोदर शिकवले जाऊ शकतात.

नि.चा अर्थ - निष्कर्ष प्र.चा अर्थः प्रश्न

---

बाप्तिस्मा नंतर - प्रौढता/परिपक्कता (अधिक समजूतदार) करणारे पाठ

| अ.नं. | अध्याय/पाठ | | उद्देश |
|---|---|---|---|
| १३. | पुनुरूत्थान | - | ख्रिस्ती धर्माच्या न्यायसिध्द साक्षीबाबत शिकवते. |
| १४. | पवित्र आत्मा | - | एक नवीन ख्रिस्ती ह्या नात्याने आपल्या जीवनामध्ये पवित्र आत्मा कोणती भूमिका निभावतो व काय काम करतो. हयाच्याबद्दल शिकवते. |
| १५. | महान कार्य | - | एका ख्रिस्ती व्यक्तीचे काय काम आहे ते काय शिकवते हयाबद्दल. |

# पाठ क्र.१
# १. परमेश्वराचा शोध

✻ उपयोग केलेली वचने :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मत्तय - ७:७, १३-१४ | २. | लुक - १३:२२-३० |
| ३. | मत्तय - ६:२५-३३ | ४. | इब्री लोकांस पत्र - ११:६ |
| ५. | मत्तय- १३:४४-४६ | ६. | प्रेषितांची कृत्ये - ८:२६-३९ |

उद्देश्य: परमेश्वराचा शोध एक असा धडा आहे जो आपल्याला परमेश्वराशी संबंध/ नाते कायम ठेवण्यासाठी आपल्याला कोण कोणत्या गोष्टींची आवश्यकता पडते. ह्या गोष्टी स्पष्ट करते.

१. मत्तय -७:७, १३-१४ - पवित्र शास्त्र हे एक महान अभिवचन आहे. जो शोधतो त्याला मिळते आणि तसेच पवित्र शास्त्र मध्ये एक मोठी चेतावनी पण आहे. जे थोडकेच आहेत ते प्राप्त करतील. जर थोडेच लोक आहेत ते जे परमेश्वराला मिळवतात तर मग किती जण त्याला योग्य प्रकारे शोधतात ?

२. लुक- १३:२२-३० होय - केवळ थोडेच जण आहेत ज्यांना उध्दार/तारण मिळणार म्हणुनच त्याला शोधण्याचा प्रत्येक प्रयत्न केला पाहीजे आसाच जे किंवा वरचेवर प्रयत्न करतात त्यांचे ते प्रयत्न उघडकीस येणार आणि परमेश्वराच्या राज्यात ते स्वीकारले जाणार नाहीत.

परमेश्वराला शोधण्यासाठी तुम्ही प्रत्येक प्रकारचा प्रयत्न कशा प्रकारे करू शकतो ?

३. मत्तय - ६:२५-३३ - तुमच्या जीवनातील अशा कोणत्या चिंता आणि गरजा आहेत ज्यामुळे तुम्हाला परमेश्वराला शोधण्याच्या प्राथमीक बाबींमध्ये अडचणी येऊ शकतात किंवा तुमच लक्ष्य/मन भटकवू शकतात? परमेश्वराचे राज्य आणि त्याची धार्मिकता ह्यांना प्रथम स्थान देण्यासाठी तुम्हाला कोणकोणत्या गोष्टीमध्ये बदल आणावा लागेल ?

४. <u>**इब्रीलोकास पत्र, ११:६**</u> - परमेश्वर फक्त त्यांना प्रतिफळ देतो. जे त्याला पूर्ण मनाने शोधतात.

५. <u>**मत्तय - १३:४४-४६**</u> - इथे एका अशा व्यक्तीचे उदाहरण दिले आहे की ज्याने तो अनमोल खजिना मिळविण्यासाठी आपल्या सर्वस्वाचाही त्याग करण्यासाठीही तयार होता.

६. <u>**प्रेषितांची कृत्ये - ८:२६-३९**</u> - इथे एका अशा शोधणाऱ्या व्यक्तीचे उदाहरण दिल आहे. जो दिनतेने परमेश्वराला प्रथम स्थान देतो आणि अशाप्रकारे परमेश्वर व त्याचा आनंद दोन्हीही मिळवितो.

ह्या गोष्टीवर लक्ष दया की कुशी देशाचा हा व्यक्ती एक व्यस्त व्यक्ती होता. एक असा व्यक्ती ज्याला परमेश्वराला शोधण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीच्या मदतीची आवश्यकता पडली. एक असा व्यक्ती जो पवित्र शास्त्राच्या उपयोग परमेश्वराला शोधण्यासाठी एक मार्गदर्शकाच्या रूपाने करत होता.

✻ आणखी काही उपयोगी वचने -

| | |
|---|---|
| १. प्रेषितांची कृत्ये - १७:१०-११ | २. यिर्मया-२९:१०-१३ |
| ३. अनुवाद-४:२८-३१ | ४. प्रेषितांची कृत्ये -१७:२२-२७ |
| ५. २ इतिहास- १५: १-४ | ६. उपदेशक-१२:१,१३-१४ |
| ७. यशया-५५:६ | ८. २ इतिहास - ७:१४ |
| ९. लुक - १९:१,१० | |

# पाठ क्र.२
# २. परमेश्वर

❃ उपयोग केलेली वचने :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रेषितांची कृत्ये - १७: २४-३० | २. | स्तोत्रसंहिता - १३५:१५-१७ |
| ३. | यिर्मया - १०:५ | ४. | अनुवाद- ५: ८-० |
| ५. | १ करिंथकरास पत्र -१०:१४ | ६. | प्रकटीकरण - २१:८ |
| ७. | योहान- ४:२४ | | |

**उद्देश्य:** ह्या धडयाचा मुख्य उद्देश हा आहे की लोकांना पवित्र शास्त्राच्या परमेश्वराबद्दल समजावे परमेश्वर एक जिवंत देत आहे ना कि एक मूर्ति.

तुमच्या परमेश्वराची प्रतिमा (रूप) काय आहे ?

कोणत्या परमेश्वराची तुम्ही आराधना करता ? हे प्रश्न केवळ तुमच्यासाठी आहेत जेणेकरून तुम्ही एक शोधणाऱ्या व्यक्तीची पार्श्वभुमी आणि त्याचा विश्वास ह्यांना समजावे.

या आपण पवित्र शास्त्रात बघुया की परमेश्वर कोण आहे. या आपण प्रेषित १७:२४ मध्ये जाऊ.

१. प्रेषित - १७:२४-३० व वचन २४ ह्या वचनानुसार परमेश्वर कोण आहे ?

परमेश्वर सृष्टीचा निर्माण कर्ता आहे. पवित्र शास्त्राच्या मते परमेश्वर कुठे राहत नाही? परमेश्वर मनुष्याने बनवलेल्या निर्मितीत किंवा इमारतीत राहत नाही.

वचन-२५-काय परमेश्वर आपल्याकडून कोणत्याही गोष्टीची अपेक्षा ठेवतो का? नाही, का ? कारण की तो स्वतः आपल्याला सर्व काही देतो.

वचन-२६ - परमेश्वराने आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी ठेवले म्हणजे सृष्टीत मनुष्याला नियोजीत स्थान ठरवून दिले. उदा. मुंबई, पुना कोल्हापूर, सोलापूर इ. तुम्ही आज इथे का आहात? ही परमेश्वराची योजना आहे का? कारण परमेश्वराची इच्छा आहे की आपण त्याला शोधावे. त्याच्याजवळ जावे आणि त्याला प्राप्त करून घ्यावे. परमेश्वराला आपल्या बरोबर संबंध नाते बनवायचे आहेत. प्रस्थापित करायचे आहे.

वचन-२७- का तो आपल्यापासून खूप लांब आहे का जसे की काही लोक विचार करतात की देव हा उंच पर्वतांवर, समुद्राच्या पलीकडे राहतो ते मोठ्या यात्रा पण करतात.



यासाठी की याला प्राप्त करावे ? नाही, पवित्र शास्त्र सांगते की तो आपल्या जवळ आहे. जर आपण त्याला शोधले तर त्याला प्राप्त करून शकतो.

२८-वचन - आपण त्याचे वंशज आहोत याचा अर्थ काय? की आपण परमेश्वराची मुले आहोत, काय आपल्यात जीवन आहे ? हा जर आपण जीवंत आहोत तर परमेश्वराचा (आत्मा) काय तो जीवंत आहे की मृत? तो जीवंत आहे.

आपला परमेश्वर एक जीवंत परमेश्वर आहे.

वचन-२९-याचा काय अर्थ आहे ? याचा अर्थ असा आहे की परमेश्वर एक निर्जीव मूर्ती नाही. जी मनुष्याच्या चातुर्याने आणि कल्पनेने बनवली गेली आहे. आपल्याला कोणी बनवले? परमेश्वराने. काय आपण त्याला बनवू शकतो काय? नाही.

पण आज जगात व बाजारात चाललय की परमेश्वराला आपण पैसे देऊन विकत घेऊ शकतो का जर मातीची मूर्ती आहे तर आपण तीला १० रू. विकत घेऊ शकतो. जर त्याच्यावर रंग लावलाय तर १०० रू. आणि जर तीच मूर्ती सोन्यात घडवली तर १,००,०००/- आणि त्याच्यात लावले असतील तर एक करोड रूपये. पण काय एका धातुला किंवा तिच्या सुंदरतेला एक मूर्तीला परमेश्वर बनवू शकतो का? कधीच नाही. लोक बनवलेल्या गोष्टींची पूजा करतात.

उदा : मुर्ती, चित्र, फोटो, सुर्य, चंद्र, साप इ.

खऱ्या जीवंत देवाला सोडून लोक ह्या सर्वांची पूजा करितात.

वचन-३० - जेव्हा जिवंत परमेश्वराचे सत्य आपल्याला समजत तेव्हा परमेश्वर आपल्याकडून काय अपेक्षा ठेवतो? त्याची इच्छा असते की आपण पश्चात्ताप करावा. पश्चात्ताप म्हणजे मन फिरविणे. ह्याचा अर्थ असा आहे की मूर्तिपूजेला सोडून देणे आणि त्याबरोबर काही नाते न ठेवणे, याबद्दल तुमचे काय विचार आहेत?

२. **स्तोत्रसंहिता**-१३५:१५-१७- हे वचन या सत्याविषयी बोलत की मुर्तिमध्ये जीव नसतो. मुर्ति मनुष्याने बनविल्या आहेत. पण प्रश्‍न असा आहे की काय मनुष्य परमेश्‍वराला बनवू शकतो का ? नाही, लोक सृष्टिकर्ता ऐवजी गाढलेल्या गोष्टींची आराधना करतात.

मूर्तीचे वेगवेगळे अवयव असतात. पण ते त्यांचा उपयोग करू शकत नाही. ते लोकांच्या प्राथनेचे उत्तर देऊ शकत नाही. आपण मनुष्य त्या मुर्तीपेक्षा जास्त चांगले आहोत. आपण कमीतकमी बघु शकतो, ऐकू शकतो, समजू शकतो आणि जाणीव करू शकतो. मग ह्याचा असा अर्थ नाही कि आपण देव आहोत. मुर्तिमध्ये (श्‍वास) जीवन नसते.

३. **यिर्मया-१०:५**- मुर्ती एका शेतात ठेवलेल्या बुजगावण्यासारखी आहे जी पक्ष्यांना भीती घालण्यासाठी ठेवली जाते, काही करू शकत नाही. पण तरीपण पक्षी त्याला घाबरतात. मुर्ति तुमच काहीही बिघडवू शकत नाही. तरीपण त्याच्याशी जोडलेली अंधश्रध्दा आणि गोष्टी यामुळे तिला सोडण्यासाठी लोक घाबरतात. मुर्ति शक्तीहीन आहे. तिला घाबरू नका. मुर्तिला उचलून घेऊन जावे लागते कारण तिला चालायला येत नाही, जर आपल्या परमेश्‍वराला चालण्यासाठी आपल्या मदतीची आवश्यकता पडते तर आपण जे शक्तीहीन मनुष्य आपल काय होणार? मुर्तिला घाबरू नका ती तुम्हाला काही करू शकत नाही. मुर्ति विषयीच्या प्रत्येक अंधश्रध्देच्या गोष्टींना काढून टाका. अशी कोणती अंधश्रध्दा आहे. ज्याच्यावर तुम्ही विश्‍वास ठेवता?

काय आपण जाणता काय की दहा आज्ञांमध्ये अशी एक आज्ञा आहे जी विशेष करून ह्या गोष्टीविषयी काय सांगते? या आपण बघू.

४. **अनुवाद -५:८-९**-परमेश्‍वर आपल्याला आज्ञा देतो की आपण स्वतःसाठी कोणतीही मुर्ति बनवू नका. आणि अजून तो विशेष करून सांगतो की आपण कोणत्याही मुर्तिच्या समोर आपले डोके टेकवू नये/पाया पडू नये.

काय आपण परमेश्वराच्या आज्ञेला मानायचे नाही का नाही ? आपण मुर्ति, चित्र किंवा मनुष्य यांची आराधना करणे बंद करून फक्त निर्माणकर्ता देव ह्याची आराधना केली पाहिजे. नविन करारामध्ये पण असे बरेच विशेष वचन आहेत जे मुर्तिपूजेबद्दल दंड ठरवितात आणि त्याच्याबद्दल सांगतात.

५. **१-करिंथकरांस पत्र** - १०:१४- मुर्ति पूजेपासून दूर पळा. काय आपण यासाठी तयार आहात का?

जेव्हा तुम्ही एका जंगली प्राण्याला बघता तेव्हा तुम्ही काय करता? तुम्ही त्याच्यापासून खूप दूर पळून जाता कि परत त्या ठिकाणी जात नाही.

६. **प्रकटीकरण-२१:८**- इथे मूर्तिपूजकांना एक खून करणारे आणि व्यभिचारी लोकांशी तुलना केली आहे. त्याचा शेवट नरक आहे.

७. **योहान ४:२४** - इथे येशु स्वतः म्हणतो की परमेश्वर एक आत्मा आहे. याचा अर्थ असा की परमेश्वराला कोणतेही रूप नाही म्हणून आपण त्याला कोणत्याही रूपात पूजले नाही पाहिजे कारण त्याला कोणतच रूप नाही.

**निष्कर्ष** - आज तुम्ही काय शिकला?

या अभ्यासाविषयी स्टडीविषयी तुम्हाला काय वाटते? काय हा अभ्यास स्टडी तुम्हाला परमेश्वराचे सत्य जाणण्यासाठी मदत करतो काय ? काय तुम्हाला अधिक जाणून घ्यायचे आहे काय ? परमेश्वराला आनंदी करण्यासाठी आपल्याला पूर्णपणे मूर्तिपूजा सोडून दयायला पाहिजे काय तुम्ही हे करण्यास तयार आहात काय?

# पाठ क्र.३
# येशु परमेश्वर आहे

✻ उपयोग केलेली वचने :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कलस्सैंकरांस पत्र २:९ | २. | मार्क : ४:३५:४१ |
| ३. | मार्क १: ४०-४२ | ४. | लुक ७:३६:३०, ४८-५० |
| ५. | योहानाचे १ले पत्र ३:५ | ६. | अनुवाद ५:७ |
| ७. | प्रेषितांचे कृत्ये ४:२२ | ८. | योहान १४:६ |

हा दुसरा धडा आहे की जे ख्रिस्ती नाहीत त्यांच्या बरोबर करायचा असतो/ मी तुम्हांला काही प्रश्न विचारणार आहे काय तुम्ही येशु विषयी ऐकले आहे का ? येशु विषयी तुम्हांला काय माहित आहे ?

मी तुम्हांला येशुच्या विषयी शिकवण्याची परवानगी मागतो हे तुम्हांला येशु कोण आहे हे माहिती होण्यासाठी मदत करेल.

१. कलस्सैंकरास पत्र २:९ हे वचन सांगते की येशुमध्येच पुर्ण देवपण आहे. ते सर्व गोष्टी जे तुम्ही परमेश्वरांमध्ये पाहता ते सर्व येशु मध्येही पाहु शकता. ह्याचा अर्थ आहे येशु परमेश्वर आहे.

ह्याचा अर्थ आहे येशुमध्ये ते सर्व गुण असले पाहिजे जे स्वर्गातील परमेश्वरांमध्ये आहेत. हे आपण पुढचे ३ परिच्छेदांमध्ये पाहणार आहोत.

२. मार्क ४:३५-४१ येशुमध्ये वादळ आणि पाणी हे नियंत्रण करण्याची शक्ती आहे.
प्र : नैसर्गिक शक्तीना नियंत्रण करण्याची शक्ती कोणांमध्ये असते? परमेश्वरांमध्ये / हयाचा अर्थ आहे. येशु परमेश्वर आहे. तो सर्व शक्तीमान आहे.

३. <u>मार्क १:४०-४२</u> येशु कोणत्याही आजारांना बरे करू शकतात. त्यांच्यामध्ये कोणत्याही व्यक्तीला बरे करण्याची शक्ती आहे. येशु परमेश्वरासारखा दयेने भरलेला होता. त्यानी लहानतल्या लहानावर अशांवर प्रेम केले. त्याने  कुष्ठरोगांना स्पर्श केला. गरीबांवर करूणा दाखविली.

४. <u>लुक ७:३६-३९,४८-५०</u> ही स्त्री खूप पापी स्त्री होती. कारण संपूर्ण शहराला तिच्या पापांबद्दल माहिती होते तरीही येशुने त्या स्त्री बद्दल दया आणि करूणा दाखवली, येशु पाप्यांवर प्रेम करतो. पापांना कोण क्षमा करू शकते ? फक्त परमेश्वर येशुने देखील परमेश्वरासारखे ह्या स्त्रीला क्षमा केली. येशु कोण आहे. येशु परमेश्वर आहे. त्यांनी ह्या स्त्रीच्या पापांची क्षमा केली तो तुमचाही सर्व पापांची क्षमा करू शकतो.

५. <u>१ योहान ३:५</u> येशु आपल्या पापांची क्षमा करण्यासाठी आला.  तुमचे व माझे पाप काय येशुने त्याच्या स्वतःचा जीवनांत पाप केले होते ? नाही, आपण कोणाला निष्पाप समजतो ? फक्त परमेश्वराला, मग येशू कोण आहे? माझा विश्वास हा आहे की तो परमेश्वर आहे. फक्त तोच असू शकतो. ज्यांने पाप केले तोच दुसऱ्यांना पापा पासून वाचवू शकतो. पण परमेश्वर होण्यासाठी त्याला निष्पाप होणे आवश्यक आहे. जर एक पाप पण त्यांनी केले असले तर त्याला परमेश्वर बनता येणार नाही. तर मग दुसऱ्या देवांबद्दल काय? काय ते निष्पाप आहे ? काय ते सिध्द आहेत ? जर ते सिध्द नाही आहे तर ते परमेश्वर बनु शकतात का ? दुसऱ्या देवांच्याबद्दल सांगा, जरी त्यांनी अनेक चांगले काम केले असतील तर परमेश्वर बनण्यासाठी फक्त हे पुरेसे नाही आहे. कारण ते सिध्द नाहीत म्हणुन त्यांना परमेश्वर म्हणता येणार नाही.

६. <u>अनुवाद : ५:८</u> परमेश्वर आपल्या आज्ञा देतो की, आपण फक्त एकाच देवाची उपासना करू शकता. कारण पवित्र शास्त्रांमध्ये एकच परमेश्वर आहे अनेक नाहीत.

७. <u>प्रेषित ४:१२</u> - येशु फक्त एक नाव आहे. ज्यामुळे संपूर्ण जगाला तारण मिळू शकते. ह्याचा व्यतिरिक्त दुसरे कोणतेच नाव नाही आहे. फक्त येशुचा नावानेच तुम्हांला तारण मिळू शकतो. आणि तुम्ही स्वर्गांत जाऊ शकता.

८. <u>**योहान १४:६**</u> येशु सांगतो की, मार्ग तोच आहेत. तोच एक मार्ग आहे. ह्याचा अर्थ असा आहे की, स्वर्गात जाण्याचा दुसरा कोणता मार्ग नाही आहे. तुम्ही इतर प्रयत्न करू शकता पण कोणताच मार्ग नाही. येशु हे सत्य आहे, पुर्ण सत्य सर्व धर्मांमध्ये काही सत्यता आहेत. पण पुर्ण सत्यता तुम्हांला येशूमध्ये मिळेल.

येशु जीवन आहे, फक्त येशु मुळेच आपण सार्वकालीक जीवन मिळवू शकतो.

<u>निष्कर्ष</u> :- आज तुम्ही येशु बद्दल काय शिकलात? येशु कोन आहे? देवांबद्दल काय काय तुम्हांला येशुच्या मागे चालायचे आहे का? जर होय, तर तुम्हांला फक्त त्याच्याच मागे चालायला पाहिजे. तुम्ही एकाच वेळेस येशु आणि इतर देवांची आराधना करू नाही शकत. जे लोक येशुचा मागे चालतात लोक त्यांना कोणत्या नावांने संबोधतात ? ख्रिस्ती, जर तुम्ही ही येशुच्या मागे चालणार तर लोक तुम्हांला कोणत्या नावांने संबोधतील? ख्रिस्ती तुम्हांला ह्यामध्ये कोणतीही अडचण नाही वाटायला पाहिजे।

# पाठ क्र.४
# येशुचे शिक्षण

उपयोग केलेली वचने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योहान ३:१-५ | २. | योहान ३:१६-१८ |
| ३. | योहान ५:५-६ | ४. | योहान ६:३५ |
| ५. | योहान ८:१२ | ६. | योहान ८:४६ |
| ७. | योहान ११:२५ | ८. | योहान १२:४८ |
| ९. | योहान २०:२९ | १०. | योहान १४:६ |

हा पाठ पुर्णपणे योहानांचा पुस्तकांमधून आहे. हा पाठ त्यांची मदत करेल यासाठी ती त्यांनी येशुचा शिक्षणांला आणि वचनांना जाणावे आणि येशुसाठी एक दृढ संकल्प बनवावेत.

१. योहान ३:१-५ इथे आपण पाहतो की येशुने शिक्षकांनाही शिकवले. येशु ने म्हटले की परमेश्वरांचा राज्यांत प्रवेश करण्यासाठी तुम्हांला नवीन जन्म घ्यायला पाहिजे. ह्याचा अर्थ आहे की तुम्हांला जीवन नवीन प्रकारे सुरू करायचे आहे. काय तुम्ही नवीन प्रकारे जन्म घेऊ इच्छिता ? तर येशु तुम्हांला एक संधी देतो की तुम्ही तुमचे जीवन एक नवीन प्रकारे चालु करावे.

२. योहान ३:१६-१८ येशुने फक्त ख्रिस्ती लोकांवरच नाही तर पूर्ण जगांवर प्रेम केले. येशु सर्व लोकांसाठी आला. काही लोक असा विश्वास करतात की येशु फक्त ख्रिस्ती लोकांचाच परमेश्वर आहे. पण पवित्र शास्त्र हे म्हणते की.

येशु ह्या जगातील प्रत्येक व्यक्तींसाठी आला. परमेश्वराना नाही वाटत कोणाचा नाश व्हावा. त्याला वाटते की प्रत्येक जातीमधील, प्रत्येक धर्मामधील, प्रत्येक सर्व प्रकारच्या लोकांना तारण मिळावे. ते तेव्हाच तारण मिळवतील जेव्हा ते येशु वर विश्वास ठेवतील.

३. <u>**योहान ५:५-६**</u> हा मनुष्य ३८ वर्षे आजारी होता. आपण पापांमुळे धार्मिकतेत किती तरी वर्ष आजारी आहोत. जर येशु येथे आला आणि तुम्हांला विचारले की काय तुला बरे होण्याची इच्छा आहे? काय तुम्हांला बदलायचे आहे ? तेव्हा तुम्ही काय म्हणाल ?

४. <u>**योहान ६:३५**</u> जे येशु जवळ येतात, तर तो त्यांचे पालन पोषण करतो, येशुने स्वतःला धार्मिकतेचे स्त्रोत म्हटले आहे.

५. <u>**योहान ८:१२**</u> येशु प्रकाश आहे. जर तुम्ही येशु मागे चालता तर तुम्हांला अंधकारांमधुन पुर्णपणे बाहेर यावे लागेल. आज तुम्ही प्रकाशात आहात की अंधारात? जर तुम्ही अंधारात आहांत तर येशु तुम्हांला प्रकाशांत आणुं शकतो ?

६. <u>**योहान ८:४६-**</u> येशु निष्पाप होता. त्याने लोकांना उघडपणे आव्हान केले त्यांनी त्याला गुन्हेगार सिध्द करावे.

७. <u>**योहान ११:२५**</u> येशु पुनरूत्थान आहे, तो आपल्याला सार्वकालीक जीवनाचे अभिवचन देत आहेत. येशु इथे पुर्नजन्माविषयी सांगत नाही. कारण की मृत्यूनंतर फक्त न्यायांची वाट पाहायची आहे. पुर्नजन्माची नाही. <u>इब्री लोकास पत्र ९:२७</u> येशु आपल्याला पुनुरूत्थानाची आशा दाखवत आहे. कारण तो स्वतः मेलेल्यातून जीवंत झाले आहे. येशु आपल्या मागे चालणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सार्वकालीक जीवनाचे अभिवचन/प्रतिज्ञा देतो.

८. <u>**योहान : १२:४८**</u> जे शब्द येशुने म्हटले त्याद्वारे शेवटचा दिवशी (न्यायाच्या दिवशी) आपला न्याय होणार आहे. तर आपल्याला त्याचे वचन वाचण्यासाठी किंवा शिकण्यासाठीच गंभीर व्हायचे नाही तर त्याला पाळण्यासाठी सुद्धा गंभीर व्हायचे आहे.

९. **योहान : २०:२९** आपणांपैकी कोणाणेही येशुला पाहिले नाही. पण जर आपण त्याच्यावर विश्वास ठेवणार तर आपणाला आशिर्वाद मिळवणार. तर तुमचा विश्वास येशुवर ठेवा. तुमचा विश्वास त्याच्यामध्ये आणा.

१०. **योहान १४:६** येशु सांगतो की तोच मार्ग आहे. एकच मार्ग ह्याचा अर्थ असा आहे की, स्वर्गासाठी दुसरा कोणता मार्ग नाही आहे. तुम्ही प्रयत्न करू शकता पण दुसरा कोणताच मार्ग नाही. तुम्हाला येशू सत्य आहे, पुर्ण सत्य प्रत्येक धर्मात काही सत्ये आहेत. पण पूर्ण सत्यता तुम्हांला येशुमध्ये मिळू शकते. येशु जीवन आहे फक्त येशुमुळेच आपण सार्वकालिक जीवन मिळवू शकतो.

**निष्कर्ष** - येशुप्रमाणे कोणी नाही आहे. येशुचं मार्ग आहे. काय तुम्ही विश्वास करता की येशु हाच एक मार्ग आहे? काय तुम्हाला येशुच्या मागे चालायचे आहे?

# पाठ क्र.५
# वचन

<u>उपयोग केलेले वचन</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | २ तिमथ्यी ३:१६-१७ | २. | इब्री लोकांस पत्रः ४: १२-१३ |
| ३. | योहान ८:३१-३२ | ४. | मत्तय १५:१-९ |
| ५. | १ तिमथ्यी ४:१६ | ६. | प्रेषित १७: १०-१२ |
| | | ७. | मत्तय ४:४ |

उद्देश्य - विश्वास ऐकल्यावर आणि ऐकणे हे परमेश्वरांच्या वचनांमधून मिळते (रोमकरास पत्र १०:१७) ह्या प्रकारे परमेश्वराचे वचनांबद्दल शिकवण्यांचा उद्देश्य आहे की त्या शोधणाऱ्याचा विश्वास येशुमध्ये वाढला पाहिजे. (आपल्या भावना, अनुभव आपल्याहुन मोठ्यांचे विचार किंवा परिवारांचा रूढी, परंपरांच्या विरूध्द)पवित्र शास्त्र ही एकचं बरोबर स्तर आहे असे धरून आपल्याला चालले पाहिजे आणि ख्रिस्ताचा खऱ्या तारणाला जाणुन घेऊन त्या स्तराप्रमाणे आपल्याला आपले जीवन जगायचे आहे.

१. **<u>२ तिमथ्यी ३:१६-१७</u>** अ. सर्व वचने परमेश्वराद्वारे आले आहेत.
ब. आपल्या जीवनांत त्याचा उपयोग केला पाहिजे.

२. **<u>इब्री लोकास पत्र : ४: १२-१३</u>** अ) वचन हे संबंध स्थापित करते (जीवंत आणि शक्तीशाली) ब) वचन कापते (दुःख पोहचवते) जसे एक प्रकारे डॉक्टरांची सुरी क) त्यातुन कापणे चांगले आहे. कारण हे आपल्या पापांना आपल्या जीवनातुन कापून टाकते.

३. **<u>योहान : ८: ३१-३२</u>** अ) बौध्दीक ज्ञान पुरेसे नाही व नाही आपण आपल्या भावनांनुसार चालू शकतो. ब) सर्वांना ख्रिस्ती (शिष्य) बनण्यासाठी येशुच्या शिक्षणाला धरून राहुन त्यानुसार चालले पाहिजे.

४. <u>**मत्तय :- १५:१-९**</u> अ) परंपरेनुसार रितीरिवाजानुसार केलेली आराधना ज्या परमेश्वरांच्या वचनांची जागा घेतात) ती आराधना व्यर्थ आहे ब) येशु आपल्याला सावधान करतो की आपण परंपरेसाठी रितीरिवाजासाठी परमेश्वरांचा वचनाला नाही टाळले पाहिजे.

५. <u>**१ तिमथ्यी ४:१६**</u> - अ)आपल्या जीवनाची आणि सिध्दांताची चौकशी ठेवणे. कारण हे एकमेकांपासून वेगळे नाही होऊ शकत. ब) तर काय अधिक महत्वपूर्ण आहे तुमचे जीवन की सिध्दांत? हे एका विमानाप्रमाणे आहे कोणते पंख महत्वपूर्ण आह ?

६. <u>**प्रेषित १७:१०-१२**</u> इथे बिरूयांचा लोकांचे उदाहरण दिले आहे. ज्यांनी फक्त उत्साहाने वचन ग्रहणच नाही केले तर प्रत्येक दिवशी त्या वचनांचे योग्यरित्या परिक्षण केले आणि समजून घेतले की जे ते ऐकतात ते योग्य आहे की नाही?

ब) शोधणाऱ्यांला प्रोत्साहन दया की तो प्रत्येक दिवशी वचन वाचुन त्यावर त्याने मनन करण्याची सवय लावावी.

७. <u>**मत्तय ४:४**</u> - अ) पवित्र शास्त्र का वाचावे? कारण येशुने म्हटले की ‘‘मनुष्य केवळ भाकरीने नव्हे तर परमेश्वरांच्या मुखातुन निघणाऱ्या प्रत्येक वचनाने जगेल.’’ ब) परंतु ज्या प्रकारे जीवंत राहण्यासाठी आपल्याला अन्नाची गरज असते तशी विश्वासांत नेहमी टिकुन राहण्यासाठी वचनांची गरज असते.

## दुसरे उपयोगी वचने

१. याकोबाचे पत्र १:२२-२५ २. मत्तय ७:१५-२०,२४-२७

३. रोमकरांस पत्र १०:१७ ४. स्तोत्रसंहिता १९:७-११,११९:११,१०५

## पुढच्या शिक्षणासाठीचे वचने

| भविष्यवाणी | | पुर्ण झाली |
|---|---|---|
| उत्पत्ती ४९:१० | ---------- | मत्तय १:१-१७ |
| यशया ७:१४ | ---------- | मत्तय १:२२-२३ |
| मीखा ५:२ | ---------- | मत्तय २:५ |
| होशेय ११:१ | ---------- | मत्तय २:१५ |
| यिर्मया ३१:१५ | ---------- | मत्तय २:१७-१८ |
| यशया ४०:३ | ---------- | मत्तय ३:३ |
| यशया ९:१-२ | ---------- | मत्तय ४: १३-१६ |
| यशया ५३:४ | ---------- | मत्तय ८:१६-१७ |
| यशया ४२:१-४ | ---------- | मत्तय १२:१५ |
| स्तोत्रसंहिता ७८:२ | ---------- | मत्तय १३:३४-३५ |
| मीखा ७:६ | ---------- | मत्तय १०:३५-३६ |
| मलाखी ३:१ | ---------- | मत्तय ११:१० |
| यशया ६:९-१० | ---------- | मत्तय १३:१३-१५ |
| स्तोत्रसंहिता ८:३ | ---------- | मत्तय २१:१६ |
| जखऱ्या ९:९ | ---------- | मत्तय २१:१-५ |
| जखऱ्या १३:७ | ---------- | मत्तय २७:३१ |

# पाठ क्रं.६
# "पाप"

उपयोग केलेली वचने

| | | | |
|---|---|---|---|
| १. | यशया ५९ : १-२ | २. | रोमकरांस पत्र ३:२३ |
| ३. | रोमकरांस पत्र ६:२३ | ४. | गलतीकरांस पत्र ५:१९-२१ |
| ५. | मार्क ७:२१-२३ | ६. | याकोबाचे पत्र ४:१७ |
| ७. | याकोबाचे पत्र ५:१६ | ८. | १ योहान १:९ |

उद्देश : आम्हांला असे वाटते कि, प्रत्येक शोधणाऱ्याला अनुग्रहाच्या द्वारे तारण मिळावे पण जर आम्ही पापांना ओळखले नाही तर कोणताच अनुग्रह नाही. होय सर्वांनी पाप केले आहे. (रोम ३:२३) म्हणून आपल्या सर्वांना देवाच्या अनुग्रहाची गरज आहे. (रोम ६:२३) हयाप्रकारे आपल्या हया धडयाचा हाच उद्देश आहे की देवाला शोधणाऱ्यांने स्वतःला अशा दृष्टीमधून पाहिले पाहिजे की, परमेश्वर त्याला पूर्णपणे पापी आणि त्याच्यापासून दूर असे समजतो. हया जाणीवेमुळे क्षमा व पश्चाताप करायची इच्छा निर्माण होते.

१. **यशया ५८:१-२**

निः आपले पाप आपल्याला परमेश्वरापासून वेगळे करतात. जेव्हा आपण पाप करतो तेव्हा आपण आपल्या व परमेश्वरामध्ये एक भिंत उभी करीत असतो. तर यामध्ये देवाचा काहीच दोष नाही. तर आपल्याला ती पापाची भिंत पाडून देवाजवळ जायला पाहिजे. पापाच्या भिंतीचे चित्र काढून समजावून हे सांगा.

२. <u>रोमकरांस पत्र ३:२३</u>

किती लोकांनी पाप केले आहे ? सर्वांनी तर मग आपणा सर्वांना पापाची क्षमा पाहिजे. एक खोटं तुम्ही बोलला, तुम्ही खोटारडे बनला तर एक पाप तुम्ही केले तर तुम्ही पापी बनला. एक पापी बनण्यासाठी तुम्ही खूप पापे करण्याची गरज नाही. आपण सर्व पापी आहोत. आपण एकमेकांपेक्षा वेगळे नाही आहोत. आपल्या सर्वांना पाप क्षमेची गरज आहे.

<u>नि.</u> जेव्हा आपण आपली तुलना दुसऱ्याबरोबर करतो तेव्हा आपल्याला कसे वाटते? आपल्याला वाटते की, मी इतरांपेक्षा खूप चांगला आहे. पण जेव्हा आपण आपली तुलना देवाबरोबर करतो तेव्हा आपण स्वतःला खूप कमी लेखतो. आपण भलेही कितीही चांगले असलो तरी आपण देवाच्या गौरवापर्यंत पोहचू शकत नाही. आपण सर्व शक्तीहीन/कमी पडतो.

३. <u>रोमकरास पत्र ६:२३</u>

<u>नि.</u> आपल्या पापामुळे आपणांला मृत्यू मिळायला हवा होता. (धार्मिक मृत्यू शारीरिक नाही.) हयाचा अर्थ असा की देवापासून कायमचे वेगळे होणे व आपल्याला नर्कामध्ये टाकले जावे.

पण येशू ख्रिस्ताद्वारे आपण त्या पापाच्या भिंतीला तोडू शकतो. तो आपल्याला सार्वकालिक जीवन देऊ शकतो. तो आपल्या सर्व पापांची क्षमा करू शकतो. असे कोण-कोणते पाप आहेत. ज्याबद्दल बायबल सांगते? चुकून केलेले (याकोब ४:१७) आणि मुद्दामहून केलेले पाप.

४. <u>गलतीकरांस पत्र ५:१९-२१</u> : <u>माहिती असूनही केलेले पाप.</u>

व्यभिचार : लैगिंक पाप

<u>मुलींची छेड काढण्याची सवयः</u> घाणेरडे शब्द बोलणे, बसमध्ये स्त्रीयांच्या मागे उभे राहणे, मुद्दामहून त्यांना स्पर्श करणे किंवा धक्का देणे.

<u>घाणेरडे चित्र पाहणे</u> : घाणेरडे पिक्चर, इंटरनेट, घाणेरडी पुस्तके चित्रे इ. हस्तमैथून (मूठमारणे) करणे.

<u>विवाहाच्या बाहेर शारीरिक संबंध</u> : शेजाऱ्यांबरोबर, प्रियकर/प्रियसी हयांच्याबरोबर वेश्यांजवळ जाणे, जवळच्या नातेवाईकांच्या बरोबर व्यभिचार. परिवारातील सदस्याबरोबर चुलतभाऊ/बहिण यांच्याबरोबर मावशी, काकी, काका, नातेवाईक भाऊ किंवा बहिणीबरोबर.

<u>समलैगिंक संबंध</u> : समान लिंग असलेल्याबरोबर शारीरिक संबंध, एकमेकांच्या गुप्त अवयवांना स्पर्श करणे, एकमेकांबरोबर हस्तमैथुन करणे, तोंडाचा व पृष्ठभागाचा त्यासाठी उपयोग करणे.

<u>लहान मुलांचा दुरूपयोगः</u> मुलांबरोबर शारीरिक संबंध, स्वतःची लैगिंक इच्छा पूर्ण करण्यासाठी मुलांचा उपयोग, मुलांना मांडीवर बसवणे किंवा हाताद्वारे लैगिंक इच्छांचा आनंद घेणे.

<u>घाणेरडे/वाईट काम</u> : स्वतःबाबत आपल्या परिवाराबाबत आणि आपल्या जुन्या जीवनाबद्दल खोटे सांगणे, परिक्षेत नक्कल/कॉपी करणे, खोटे प्रमाणपत्र बनविणे, चुकीच्या भाषेचा उपयोग,चोरी.

<u>लोभ</u> : आसक्त, स्वतःला खुष करणे, काहीपण गरजेपेक्षा जास्त करणे, अधिक झोपणे, आळस, अधिक खाणे/जेवणे, काहीपण जे गरजेपेक्षा जास्त करणे म्हणजे लोभ आहे.

<u>मुर्तिपूजा</u> : मूर्ती, फोटो, चित्रे, दगड-धोंडे ,गुरू यांची पुजा करणे किंवा कोणत्याही व्यक्तीला किंवा वस्तुला परमेश्वरापेक्षा उच्च मानने.

<u>जादू-टोना</u> : काळे जादू, देवाऐवजी दुसऱ्या शक्तीवर विश्वास करणे, भविष्य सांगणारे, राशीचक्रावर विश्वास करणारे, देव नाही तर आपल्या हातांच्या रेषा आणि राशी आपल्या जीवनावर नियंत्रण करणे असा विश्वास करणे पाप आहे.

<u>वैर</u> : क्षमा न करणे, शत्रुत्व, संपत्ती/मिळकतीसाठी भांडणे, तुम्हांला कोणी तरी दुःखावले तर त्याच्याबरोबर वैर ठेवणे हे सुध्दा चुकीचे आहे.

<u>भांडण</u> : नात्यामध्ये फट पडणे. काय तुमच्या जीवनामध्ये विवाहामध्ये अशी काही भांडणे आहेत का की ते असून मिटवली गेली नाहीत?

<u>ईर्ष्या</u> : स्वतःचा हक्क गाजवणे.

<u>राग</u> : इतका राग करणे की तुम्ही शिव्या द्यायला लागाल, वस्तू फेकून द्याल, माराल, दरवाजा आपटणे.

<u>स्वार्थीपणा (विरोघ)</u> : फक्त स्वःत बाबतीत चिंतीत, दुसऱ्याची कोणतीच चिंता नाही, स्वतःच्या भविष्याची आणि कामांची चिंता यासाठी की त्याला कसे प्राप्त करावे.

फूट : भांडणे, असहमती

गटबाजी/दलबदलूपणा : असहमती लोकांचा गट बनविणे, कोणत्याही गटामध्ये विरोधी गट बनविणे.

केवा : दुसऱ्यांच्या संपत्ती आणि त्यांच्याकडे असणाऱ्या वस्तुचा लोभ, दुसऱ्याच्या प्रगतीवर नाखूश असणे, देवाने जे दिले त्याच्यामध्ये संतुष्ट नसणे.

स्वच्छंदीपणा/मतवालेपना : दारूबाजी, ड्रग्ज घेणे, तंबाखू, सिगारेट ओढणे, गुटखा खाणे, सर्व प्रकारची असणे करणे.

रंगेलपणा : वाईट कार्यक्रम (पार्टी),एक गटामध्ये काहीही वाईट गोष्टी करणे.

५. **मार्क ७:२१-२३**

नि. पाप आतून म्हणजे आपल्या अंतकरणातून/मनातून निर्माण होते. तर आपल्या पापासाठी कोण जबाबदार आहे ? आपण स्वतः

प्र. काय आपण आपल्या पापांचा दोष दुसऱ्यांवर किंवा परिस्थितीवर लावू शकतो ? नाही आपल्या सर्व पापांची जबाबदारी आपण स्वतः घेतली पाहिजे. होय असं होऊ शकतं की चुकीच्या गोष्टी करण्यासाठी दुसरे लोक आपल्याला उकसवतील पण ते चुकीचे करणे किंवा योग्य ते करणे हे पूर्णपणे आपल्या नियंत्रणामध्ये आहे.

६. **याकोब ५:१६ आणि योहान १:९**

नि. ही दोन्ही वचने पाप कबूल करण्याबाबत आहे. तो परमेश्वरच आहे जो आपल्याला आपल्या पापाची क्षमा करू शकतो.

- तर आपल्याला आपले विशेष पापांना देवासमोर कबूल (स्वीकारले/मानले) केले पाहिजे. (स्त्रोत्रसंहिता ३२:१-५)

- वचन स्पष्टपणे आपणाला दर्शविते की, आपण आपले पाप इतर भाऊ/बहिणींच्या समोर मोकळेपणाने कबूल केले पाहिजे हयासाठी की आपल्याला धार्मिक सल्ला आणि ते मध्यस्थी होऊन प्रार्थना केले जावी.
- हयाचा असाही अर्थ होतो की, आपण त्या व्यक्तीला ज्याच्याविरूध्द आपण पाप केले आहे ते कबूल (मानने/क्षमा मागणे) करावे.

**सल्ला :**

जर देवाला शोधणारा पाहिजे तर त्याला प्रोत्साहन देवून त्याला त्याच्या विशेष पापांची यादी बनवू शकतो. जेवढेपण त्याला आठवते तेवढे यासाठी की तो देवाविरूध्द आणि लोकांच्याविरूध्द केलेल्या पापांना ओळखू शकेल किंवा आपण त्यांना हा ही सल्ला देवू शकतो की, त्यांनी आपल्या मागच्या पापांची कबुलीमध्ये देवाला त्यांनी एक पत्र लिहावे. आपण त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे की, त्यांनी ते पत्र/यादी पुढच्या स्टडीच्या वेळेस घेवून यावे.

**निष्कर्ष :**

तुमचे विशेष पाप कबूल करण्यामध्ये तुम्हांला काय वाटत आहे ? हयाच्या अगोदर तुम्ही तुमच्या जीवनाबाबत कोणाबरोबर मोकळेपणाने बोलला आहात ? आपण आपले विशेष पाप देवाला शोधणाऱ्यांसमोर ठेवून कबुलीचे एक उदाहरण ठेवू शकतो.

**दुसरे उपयोगी वचने :**

१. स्तोत्र ३२:१-५ २. नीतीसुत्रे २८:१३ ३. योहान ३:१९-२१

४. प्रेषितांची कृत्ये ३:१९ ५. २ तीमथ्यी३:१-५ ६. इब्री ४:१३

७. १ योहान १: ५-१०

# पाठ ७
# वधस्तंभ

उपयोग केलेली वचने :

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मार्क १४:३२-६५ | २) | मार्क १५:१-२० |
| ३) | लूक २३:३२-३४ | ४) | मार्क १५:३७-५७ |
| ५) | १ पेत्र २:२१-२५ | ६) | २ करिंथ ५:१४-१५ |

सूचना : हा पाठ शिकायच्या आधी ''पॅशन ऑफ क्राईस्ट'' हा चित्रपट दाखवावा.

उद्देश :

'' कारण देवाने जगावर एवढी प्रिती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला यासाठी की जो कोणी त्याच्यावर विश्‍वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये, तर त्याला सार्वकालीक जीवन प्राप्त व्हावे''. देवाने आपला एकुलता एक पुत्र यासाठी नाही दिला की आपला नाश व्हावा. तर यासाठी दिला की त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे. (योहान ३:१६-१७)

येथे सुवार्ताप्रसार शिगेला पोहचलेचा आपल्याला आढळतो. आपल्याला अनुग्रहाच्या द्वारे वाचवण्यात आले आहे. आपण येशूच्या प्रेमाने भरलेल्या बलिदानामुळे वाचलो आहोत. हे लक्षात ठेवा की परमेश्‍वराचा शोध करणाऱ्यांला देवाच्या अनुग्रहाची गरज आहे, या जाणीवमुळेच हा अनुग्रहाचा धडा असरदार होईल. शोधणाऱ्याला याची जाणीव पाहीजे की तो ही येशूच्या मृत्यूला जबाबदार आहे. याची जाणीव आपल्याला पुढे जाऊन वैयक्तिकरित्या येशूच्या प्रेमाबद्दल आणि त्याच्या क्षमेबद्दल आदर आणि आनंद उत्पन्न करेल. हा एक गंभीर धडा आहे जेथे आपण वधस्तंभावर जाणाऱ्या येशुचे शारीरिक,भावनिक आणि धार्मिक दु:खावर एक नजर टाकणार आहोत. या प्रार्थना करूया.

मार्क १४:३२-४२

प्रश्‍न : यावेळी येशूला काय वाटत आहे. (अतिशय दु:खी आणि दु:खाने इतके व्याकूळ की जसे मरणाच्या खूप जवळ आहोत.)

प्रश्‍न : जेव्हा येशूने प्रार्थना केली तेव्हा त्याला वधस्तंभावर जायचे होते काय ? (नाही)

प्रार्थनेच्या शेवटी येशूचा स्वभाव कसा आहे ? (वचन ४२) ?
(तो मरण्यासाठी तयार होता.) याचप्रकारे तुम्हालाही तुमच्या संघर्षासाठी त्या वेळेपर्यंत प्रार्थना करायला पाहिजे जोपर्यंत तुमचे मन बदलत नाही.
प्रश्न : कधी असे झाले आहे का की तुम्हाला तुमच्या मित्राची गरज आहे पण त्यावेळी तो तेथे नाही आहे असं कधी तुमच्याबरोबर झाले आहे ? तुमच्याविषयी सांगा ?
प्रश्न : तुम्हाला माहित आहे का की येशू हे सर्व का करत होता ?
(कारण तो आपल्यावर प्रेम करतो. आपले पाप, आपले घमंड, आपले खोटेपण आणि आपला स्वार्थ या कारणांसाठी)

२. मार्क १४:४३-५०

प्रश्न : यहूदाने येशूला धोखा दिला. तुम्हालाही कोणी धोखा दिला आहे का ?
तुमचे विचार सांगा.
प्रश्न : या परिस्थितीमध्ये जर येशूने विचार केला असता तर तो काय काय करू शकत होते ?
२२००० स्वर्गदूतांना पाठवून त्यांचा नाश करू शकत होता. (मत्तय २६:५३)
जेव्हा येशूला पकडून देण्यात आले तेव्हा त्याच्या शिष्यांनी काय काय केले ? (वचन ५०) ते त्याला सोडून पळून गेले.
प्रश्न : तुम्ही एकटे आहात असे तुम्हाला कधी वाटले आहे का ? जसे की जगात कोणाला तुमची काळजी नाही असे कधी वाटले आहे का ? तुमच्याविषयी सांगा.
प्रश्न : हे सर्व येशू कोणासाठी करत होता ? (आपल्यासाठी, आपल्यावरच्या प्रेमापोटी, आपले पाप, आपले खोटेपण, आळस, घमंड या कारणांसाठी)

३. मार्क १४:५३-६५

प्रश्न : येथे येशूवर एक खटला चालवला. तो कशाप्रकारचा होता ?
(एक चुकीचा खटला)
प्रश्न : काय तुमच्यावर कधी अन्याय झाला आहे ?
जेव्हा आपल्यावर अन्याय होतो तेव्हा आपण कशी प्रतिक्रिया करतो ?

प्रश्न : मागच्या ३ वर्षामध्ये येशूने अनेक लोकांना बरे केले त्या लोकांपैकी येशूला या खटल्यातून वाचवायला कोणी आले काय ?

प्रश्न : काय तुम्हाला कधी असे वाटले आहे की, तुमच्या चांगल्या कामाबद्दल कोणीही तुमची प्रशंसा केली नाही, स्तुती केली नाही ? तुम्ही सांगा.

प्रश्न : त्यांनी येशूच्या डोळयावर पट्टी बांधली, त्याला मारले, त्याची चेष्टा केली त्याच्यावर थुंकले व त्याला मारले काय तुमच्यावर कधी कोणी थुंकले आहे का ? तुम्हाला कोणी मारले आहे का ?

प्रश्न : येशू हे सर्व का करत होता ? (कारण आपल्या पापामुळे, आपले व्यभिचार, घमंड आणि रागामुळे)

प्रश्न : पुढे लोकांनी पेत्राला विचारले तू येशूला ओळखतोस काय ? आणि त्याने ३ वेळा येशूचा नकार केला. लूक २२:५४-८२ मध्ये वचन सांगते ही गोष्ट येशूला अगोदरच माहित होती. तेव्हा पेत्र बाहेर निघून गेला आणि मोठमोठयाने रडू लागला.

प्रश्न : काय कधी तुम्ही तुम्हांला तुमच्या पाठीमागे कोणी वाईट बोललेले ऐकले आहे ? तुम्हाला त्यावेळी कसे वाटले ? तुम्ही सांगा.

प्रश्न : तुम्हांला माहिती आहे येशू ते सर्व का करत होता ? (कारण तो आपल्यावर प्रेम करतो.)

## ४. मार्क १५:१-५

येशू पूर्ण रात्र जागला होता. त्याला मारले, त्याच्यावर थुंकले आणि तेथे आणखी एका खटल्यासाठी तो तयार होता.

प्रश्न : येशूची तुलना एका खुनी (बरब्बा) शी करण्यात आली. त्या लोकांना त्या दोघापैकी एकाला निवडायला लावले तर विचार करा येशूला कसे वाटले असेल ?

प्रश्न : पीलाताने न्यायाधिशाच्या स्थानी होता. त्याला येशूचा न्याय करायचा होता. तुम्हाला वाटते काय की तो येशूला पसंत करत होता ?

प्रश्न : पीलाताने लोकांना समजवण्याचा प्रयत्न केला. (''हयाच्यामध्ये काय वाईट आहे'' ?) लोकांना त्यांची ही गोष्ट आवडली काय ? (नाही ते लोक अधिक मोठयाने ओरडू लागले.)

प्रश्न : जेव्हा लोक हे पाहतात की त्यांची हार होत आहे. तेव्हा त्यांची प्रतिक्रिया काय असते ? (ओरडणे)

प्रश्न : मत्तय २७:२४ च्यानुसार पीलाताने या गोष्टीतून हात धुवून घेतला. त्यामुळे तो निर्दोष ठरला काय ? नाही. पीलाताला निर्दोष व्हायचे होते पण त्याची किंमत चुकवायची नव्हती. त्यामुळे त्याचा हा निर्णय न घेणे येशूविषयी अनिर्णय बनला.

प्रश्न : येशूला चाबकाचे फटके मारण्यात आले. तुम्हाला माहित आहे का चाबकाचे फटके कसे मारतात ?

(सुरूवातीला ते तुमचे त्याचे कपडे काढतात, मग चमडयाचा एक चाबूक बनवतात आणि त्याच्या टोकाला हाडांचा आणि काचेच्या तुकडयांचा चुरा लावतात आणि त्याने ते तुम्हांला खूप खूप वेळा मारतात. रक्त वाहू लागते, तो त्रास असहनीय होतो ते तोपर्यंत मारतात. जोपर्यंत तुमच्या पाठीचा खेमा होत नाही.)

आणि हे सर्व सहन करण्यासाठी येशू तयार होता हे तुम्हांला माहित आहे काय ? (आपल्या पापांसाठी आपल्या सिगारेटच्या व्यसनासाठी आपल्या स्वार्थीपणासाठी येशून हे सर्व सहन केले.)

५. मार्क १५:१६-२०

प्रश्न : ते येशूला घेऊन गेले व सगळे सैनिक त्याची चेष्टा करीत होते. काय तुम्ही असं पाहिलं आहे का की, एक गर्दी कोणत्या तरी व्यक्तीला चारी बाजूनी घेऊन त्याच्याशी वाईट चुकीचे पध्दतीने वागत आहे ?

नि. त्यांनी येशूचे वस्त्रे काढली व नवीन वस्त्रे त्याला घातली. त्यानंतर त्यांनी काटयांचा मुकूट करून त्याच्या डोक्यावर तो रूतवला. नंतर त्यांनी त्याची वस्त्रे काढली व त्याला वधस्तंभावर खिळण्यासाठी घेऊन गेले.

प्रश्न : जेव्हा ते येशूला मारत होते तेव्हा त्या काटयाच्या मुकूटाचे काय झाले? (तो येशूच्या डोक्यामध्ये अधिक रूतत गेला व त्याच्या वेदना वाढत गेल्या.)

प्रश्न : जेव्हा त्यांनी येशूचे वस्त्रे खेचून काढली तेव्हा त्याच्या पाठीला कसे वाटले असेल ? (हे खूप वेदनादायक होते जसे की कोणत्याही जखमेवर लावलेल्या पट्टीला जोरात ओढून काढणे.)

प्रश्न : तुम्हांला माहिती आहे हे सर्व येशू का करत होते ? (कारण तो आपल्यावरप्रेम करतो. आपल्या पापे, व्यभिचार आणि स्वार्थीपणाच्या कारणासाठी).

६. लूक २३:३२-३४ त्यांनी येशूच्या सोललेल्या पाठीवर वधस्तंभ लादला व त्याला चालायला लावले. नंतर त्यांनी त्याचे कपडे काढले आणि त्याच्या हातात व पायात मोळे मारले. नंतर त्यांनी त्याला वद्यस्तंभावर उघडे लटकवले. आणि दिवसभर त्याची पाठ त्या वधस्तंभावर वर खाली होत होती. त्याला खूप त्रास होत होता.

प्रश्न : तुम्हाला माहित आहे का की ज्याला वधस्तंभावर लटकवण्यात येते. त्याचा मृत्यू कसा होतो ? ते श्वास घेऊ शकत नाहीत म्हणून त्यांना स्वतःला हातात ठोकलेल्या खिळयावर तान देवून स्वतःला वर करावे लागते. पण असे केल्याने शरीरात खूप कळा मारतात. म्हणून ते स्वतःला पुन्हा खाली करतात. हे तोपर्यंत सुरू राहते जोपर्यंत ते थकून जोपर्यंत त्यांची शक्ती संपत नाही, जोपर्यंत त्यांचा श्वास घुसमटत नाही तोपर्यंत त्यांना हयाचा त्रास होतो व अतिशय भयानक असा त्यांचा मृत्यू होतो.

प्रश्न : जेव्हा तुमचा एखादा दिवस खूप वाईट जातो. तेव्हा तुमच्या मुखातून प्रथम कोणता शब्द बाहेर येतो ? (रागाने भरलेले चुकीचे शब्द)
या आपण येशूचे प्रथम शब्द पाहूया जे तो वधस्तंभावर बोलला.
प्रश्न : वचन ३४ मध्ये येशू काय म्हणतो ? (''हे देवा त्यांना क्षमा कर''...)
प्रश्न : मृत्यूसमोर असतांनाही येशूला कशाची चिंता होती ? (वचन ३४)
प्रश्न : वधस्तंभावर कोणाला मरायला हवे होते ? येशूला की आपल्याला ?

प्र. मत्तय २७:४४ नुसार येथे २ चोर होते. दोघांनीही येशूची निंदा केली. तरीही एका चोराने दुसऱ्या चोराला पाहिले आणि तो पश्चातापाने येशूकडे वळला आणि येशुने त्याला क्षमा केली.

येथे बरोबर आपण देवाचे मन ओळखू शकतो. परमेश्वर आपल्याला प्रेम करतो. येशू त्या चोराला नर्कात टाकू शकत होता. पण त्याने तसे नाही केले. आणि आज तुम्हीही क्षमा मिळवू शकता. आज शरीराने येशू येथे उपस्थित नाही आहे  पण त्याने त्याचे पवित्रशास्त्र आपल्याला दिले आहे. ते आपल्याला तारणाचा त्याचा मार्ग दाखवते.

७. प्र. मार्क १५:३७-५७ येथे आपण पाहतो की, येशूने आपला प्राण सोडला. तो वेदनेने ओरडतो. ''माझ्या देवा, माझ्या देवा तू माझा त्याग का केलास'' ?
प्रश्न :  बायबल सांगते की, परमेश्वर नेहमीच येशू बरोबर होता. मग येशू येथे असे का म्हणतो की, देवा तू माझा त्याग का केलास ? (आपल्या पापांमुळे) हे अधिक जाणून घेण्यासाठी आपण पेत्राचे पत्र वाचूया.

८.  १ ले पत्र २:२४  जेव्हा येशू वधस्तंभावर मेला तेव्हा त्याने काय उचलले ? (आपले पाप)
प्रश्न  :  जेव्हा तुम्ही पाप करता तेव्हा तुम्हांला कसे वाटते ? (दोशी,वाईट)  प्र. कल्पना करा की तुम्ही तुमच्या सर्व पापांचा दोष एकाच वेळी भोगत आहात. नंतर कल्पना करा की, सर्व इतर लोकांच्या पापाची शिक्षा, सर्व बलात्कार, सर्व खोटेपणा, सर्व खून, सर्व अन्याय आपण सर्वांनी आयुष्यभर जी पापे केली ती सर्व येशूने एकाच वेळी भोगली त्याला असे वाटले जसे की ते त्यानेच केले. आणि पाप आपल्याला परमेश्वरापासून दूर करते. (यशया ५९:१-२ कल्लसै १:२१) येशूच्या मरतेवेळी परमेश्वर त्याच्याबरोबर नव्हता. येशू एकटाच होता. आपल्या पापांनी त्याला देवापासून दूर केले.
प्रश्न : हे सर्व येशूने का केले ?  (कारण तो आपल्यावर प्रेम करतो, आपली पापे, आपले वाईट विचार, धोखा आणि राग या कारणांमुळे)
आणखी एक गोष्ट आहे जी वधस्तंभ समजून घ्यायला मदत करेल.

## वडील-मुलाचे उदाहरण.

परमेश्वर वडील आणि येशू मुलगा खाली पृथ्वीकडे पाहत होते. त्यांनी सर्व लोकांना पाहिले. त्याने तुम्हांला आणि मला पाहिले. तेव्हा येशूने म्हटले हे देवा मी हया लोकांवर प्रेम करतो मी त्यांच्यासाठी काय करू शकतो ? परमेश्वर म्हणाला, माझ्या मुला तुला समजत नाही आहे ते आपल्यासारखे नाही आहेत. येशूने म्हटले मी त्यांच्यासाठी काहीही करू शकतो जोपर्यंत तू माझ्याबरोबर आहेस. परमेश्वर म्हणाला या लोकांची मदत करायचा एकच मार्ग आहे. तुला स्वतः पृथ्वीवर जावे लागणार, त्यांच्यासारखे जीवन जगावे लागणार, त्यांच्यासारखे खाणे, आजारी होणे आणि थकावे लागणार तेव्हा येशू म्हणाला हे पित्या मी त्यांच्यावर प्रेम करतो आणि जोपर्यंत तू माझ्याबरोबर आहेस मी काहीही करू शकतो. परमेश्वर म्हणाला, तू समजून घेत नाही आहेस, लोक तुझी चेष्टा करतील आणि तुला स्विकारणार नाहीत. तुझ्या घरचे लोक स्वतः असे म्हणतील की तू वेडा आहेस आणि तुझ्या मागे येणारे शेवटी तुला सोडून जातील. व तू एकटा पडशील, परंतु येशूने म्हटले, पित्या जोपर्यंत तू माझ्याबरोबर आहेस मी हे करू शकतो. तेव्हा परमेश्वर म्हणाला, लोक तुझ्यावर खोटा आरोप लादतील, तुला मारतील, तुझ्यावर थुंकतील आणि तुला चाबकाने मारतील ते तुझ्या रक्तबंबाळ शरीराला वधस्तंभावर चढवतील आणि असा तू मरशील. येशू म्हणाला, ‘‘जोपर्यंत पित्या तू माझ्याबरोबर आहेस मी हे करायला तयार आहे’’. परमेश्वर त्याला म्हणाला, मला तुला समजत नाही जेव्हा तू त्या असहय पीडेतून जात असणार तेव्हा तुला त्यांच्या चुकांची त्यांच्या पापाची जाणीव होईल आणि त्यांचे पाप तुला माझ्यापासून वेगळे करतील. त्यावेळी जेव्हा तुला माझी सर्वात जास्त गरज असेल तेव्हा मी तुझ्याबरोबर नसणार. तेव्हा येशू म्हणाला हे पित्या आता मला समजले पण मी जाणार.

प्रश्न : पाहिले, येशू आपल्यावर किती प्रेम करतो ?

❊ वैद्यकीय अहवाल (मेडिकल रिपोर्ट) बाबत माहिती ?

९. १ पेत्र २: २१-२५

प्रश्न : वचन २१ च्या अणुसार येशूला इतक्या पीडा का झाल्या ?

(कारण आपल्यासाठी एक कित्ता मिळावा यासाठी की आपणही त्याच्यासारखे बनावे.) शेवटपर्यंत तो पाप विरहीत होता.

प्रश्न : काय तुम्हाला याची जाणीव होत आहे का की येशू तुमच्यासाठी मेला ? तुम्हाला हे समजत आहे का की पृथ्वीवर तुम्ही एकटे असता तरी येशू तुमच्यासाठी मेला असता ?

प्रश्न : एक ख्रिस्ती या नात्याने तुम्हीही दुःख भोगायला तयार आहात का ?

प्रश्न : वचन २४च्या नुसार येशूने आपले पाप त्यांच्या स्वतःवर का घेतले ? (हयासाठी की आपल्या पापांसाठी मेले जाऊन, धार्मिकतेसाठी जगावे.)

१०. २ करिंथ ५:१४-१५

प्रश्न : येशूच्या मागे चालायला पौलाला कोणती गोष्टी प्रेरित करत आहे ? (प्रेम)

प्रश्न : काय तुम्हांला माहिती आहे आपल्याला इतके संकल्पीत बनायला कोणती गोष्ट प्रेरणा देते ? तुमच्याविषयी सांगा ?

प्रश्न : वचन १५ नुसार येशू का मेला (हयासाठी की आपण हयापुढे स्वतःसाठी नाही पण येशूसाठी जगावे.)

प्रश्न : या जगात लोक कोणासाठी जगतात ? (स्वतःसाठी)

प्रश्न : आतापर्यंत तुम्ही कोणासाठी जगत होता ? (तुमच्या स्वतःसाठी)

प्रश्न : काय तुम्हाला वाटते का की तुम्ही आता गंभीर का व्हायला पाहिजे ?

प्रश्न : आता तुम्हाला कळाले की, येथूने तुमच्यासाठी प्राण दिला, तुमच्यासाठी दुःख सोसले आता तुम्हांला कसे वाटत आहे ?

आव्हान : येशूच्या मागे चालण्यासाठी आणि तुमचे जीवन बदलण्यासाठी गंभीर व्हा... प्रेमाने चाला, जसे येशू चालला.( इफीस ५:१-२ इतर उपयोगी वचने

इफीस ५:१-२, यशया ५३)

वधस्तंभावर खिळले जाण्याबाबत एक चिकित्सक वैद्यकीय माहिती.

फांशी, विजेच्या झटक्याने मृत्यू, गुडघ्याची वाटी काढणे, गॅस चेंबर यासारख्या शिक्षा खूप भयानक वाटतात. आजकाल याविषयी लोक बोलतात आणि हे सर्व ऐकून आपण भीतीने कापतो. पण आपण पुढे पाहूया की या सर्व शिक्षा वधस्तंभाच्या सत्यासमोर किरकोळ पडतात.

आजकाल कोणालाही क्रुसावर खिळले नाही जात. आपल्यासाठी वधस्तंभ आजकाल एक अलंकार असू शकतो. खिडकीच्या रंगीत काचेवर बनलेले भावनात्मक चित्र असेल आणि एक शांत मृत्यूची मूर्ती फक्त तेवढेच एखाद्याला मृत्यूदंड देण्याची रित होती. रोमन लोकांनी त्याला वाढवून एक नेहमीची कला बनवली होती. या प्रकाराला असे बनवले होते की, त्या व्यक्तीला जास्तीत जास्त त्रास व्हावा आणि त्याचा मृत्यू लवकर येऊ नये, हे सर्वांसमोर केले जायचे जेणेकरून लोक याला भ्यावे व कोणी असा गुन्हा करू नये हा खूप भयानक मृत्यू होता आणि त्यामुळे खूप भीती वाटते.

रक्ताचा घाम : लूक २२:४४ मग अत्यंत विव्हळ होऊन त्याने आग्रहाने प्रार्थना केली तेव्हा रक्ताचे मोठमोठे थेंब पडावे असा त्यांचा घाम पडत होता.

त्याचा घाम असाधारण पध्दतीने तीव्र होता कारण त्याची मानसीक स्थिती तीव्र होती. शरीरात पाण्याची कमी, थकवा याने त्याचा अधिक अशक्त बनवले.

मारणे : या परिस्थितीत येशूला पहिल्यांदा शारीरिक इजा केली गेली. डोळयावर पट्टी बांधून चेहऱ्यावर व डोक्यावर बुक्यांचा व चषडांकाचा मार दिला. बुक्क्या कोठून मारल्या जात आहेत हे न कळल्यामुळे तो अतिशय जखमी झाला. खोटया आरोपाखाली झालेल्या शारीरिक इजेला आपण कमी नाही गणले पाहिजे याचा विचार करा, की अशक्त शरीर आणि थकलेला येशू या गोष्टी सहन करत होता. कदाचित त्याला खूप मोठा धक्का लागला असेल.

चाबकांचे फटके :

मागच्या १२ तासामध्ये येशूला भावनात्मक पीडा झाल्या,जवळचे मित्र सोडून गेले. मारहाण आणि पूर्ण रात्र जागरण याबरोबर अन्यायी गोष्टी ऐकत चालावे लागले. पलिष्टी राष्ट्रांमध्ये प्रवास करतांना त्याला शारीरिक उर्जा मिळाली असेल पण तो या शिक्षेला तयार नव्हता. याचा परिणाम खूप वाईट होवू शकत होता.

ज्या व्यक्तीला चाबकाचा मार दिला जातो त्याचे कपडे काढून त्याला खांबाला बांधून त्याचे हात त्याच्या डोक्यांच्यावर खांबाला बांधले जाते. मग त्याच्या मागे आणि बाजूला उभे राहून सैनिक त्याच्या पाठीवर, मागे आणि पायावर चाबकाने मारत. त्या चाबकाला असे बनवले जात की त्याचा मार खाल्याने एखादा व्यक्ती अर्धमेला व्हावा. चाबकाच्या टोकावर चमडयाच्या दोऱ्यासारखे बांधून त्याला लोखंडी खिळयांचे गोल बांधले जायचे. कधी-कधी या ठिकाणी बकऱ्याच्या हाडांचा चुरा लावला जात असे. तेव्हा चाबकाचा मार सुरू केला जायचा तेव्हा सुरूवातीला चमडयाच्या दोऱ्यांनी एखाद्याच्या शरीरावर छोटे-छोटे घाव व्हायचे आणि नंतर ते पसरत जायचे. आणि नंतरनंतर शरीरातील सुक्ष्म पडदा (चमडयाच्या खालचा भाग) शिर व रक्तवाहिन्याही कापल्या जात त्यामुळे शरिरातील रक्तही जोरात वाहत असते चाबकाच्या टोकाला लावलेले लोखंडी टोकदार गोळे सुरूवातीला मोठा घाव करायचे आणि नंतर ती जखम अधिक विस्तृत व्हायची आणि जेव्हा चाबकाला पुन्हा मागे ओढले जायचे तेव्हा चाबकाचा चुरा मासांला घासल्यामुळे, मांस फाटले जायचे. जेव्हा चाबकाचे फटक्यांमुळे पूर्ण मांस जायचे (३९) तोपर्यंत एखाद्याचे शरीर चाळण झालेली असायचे.

शुभवर्तमान लिहिणाऱ्याचे शब्द हे प्रकट करतात की, येशूला मारलेले चाबकाचे फटके किती भयानक होते. जेव्हा फटके मारण्याच्या खुंटीतून त्याला सोडवण्यात आले तेव्हा निश्चितच तो बेशुध्द असणार.

थट्टा/चेष्टा करणे : येशूला शक्ती मिळवण्यासाठी त्यांनी त्याला वेळ दिला नाही तर लगेचच त्याला दुसऱ्या परिक्षेत टाकण्यात आले. येशूला उभे राहण्याचीही ताकत नव्हती आणि त्याची थट्टा उडवणाऱ्या सैनिकांनी त्याचा किरमीजी झगा घातला त्याच्या डोक्यावर काटयांचा मुकूट घातला

आणि हा व्यंगतेढा (शास्त्रानुसार) पूर्ण करण्यासाठी त्याला राजासारखे दाखवण्यासाठी त्याच्या हातात लाकडी काठी दिली. नंतर ते येशूवर थुंकले आणि त्याच्या डोक्याच्या काट्यांचा मुकूटावर घडया मारल्या असे केल्याने ते काटे येशूच्या डोक्याच्या नाजूक भागात घुसले आणि त्याच्या डोक्यातून मोठयाप्रमाणात रक्तप्रवाह होऊ लागला. पण यापेक्षा भयानक होते ते म्हणजे त्यांनी येथूच्या शरीरावर खातलेल्या किरमीजी झग्याला त्यांनी ओढून फाडले जेणेकरून त्याच्या जखमा पुन्हा मोकळया झाल्या. शरीराने आणि मनाने कमजोर पडलेल्या येशूला ते पुढे वधस्तंभावर खिळण्यास घेऊन गेले.

## वधस्तंभावर चढवणे

रोमी लोकांनी बनवलेला तो वधस्तंभ इतका जड होता की, त्याला उचलून घेऊन चालणे खूप कठीण होते. त्यामुळे वधस्तंभाचा आडवा भाग वधस्तंभावर खिळवण्यात येणाऱ्याला आपल्या खांद्यावर उचलून शहराबाहेर त्या ठिकाणी न्यावा लागत असे. (आणि वधस्तंभाचा उभा भाग जो वजनदार असतो तो नेहमी तेथेच उभा गाठलेला असायचा.) हा अवजड भाग येशू उचलू शकला नाही आणि तो पडला त्यामुळे ते सर्व पाहणाऱ्यापैकी एकाला तो उचलून न्यावा लागला. त्या वधस्तंभाचे वजन जवळ जवळ ५० ते ६० किलोचे होते.

खिळे मारण्याच्या आधी येशूला द्राक्षरस आणि आंब दिला गेला पण येशूने तो पिला नाही. (हे पिल्याने वेदना कमी व्हायच्या.) खाली वधस्तंभावर त्याला आपटण्यात आले आणि त्याच्या हातात खिळे मारण्यात आले.

हे खिळे ६ इंच लांब आणि पाऊण इंच जाड असायचे ते हातात मारल्याने त्याला असहय वेदना झाल्या. योग्य पद्धतीने ते मोळे मारले जात असत. जेणेकरून वदस्तंभावर खिळलेल्या व्यक्तीचे वचन त्या खिळयांवर पेलवले जाईल. पायात खिळे मारायची तयारी झाली तेव्हा येशूला वर उचलले गेले आणि उभ्या लाकडाला आडवे लाकूड जोडले गेले. तेव्हा पायांना गुडघ्यातून थोडे वाकवून पायात मोळे मारण्यात आले आणि पुन्हा काही नसा तुटल्या आणि असहनीय वेदना झाल्या. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, खिळे अशाप्रकारे मारण्यात आले जेणेकरून मोठया नसा

तुटल्या जाऊ नये आणि जास्त रक्त वाहू नये. जेणेकरून वेदना सहनाचा वेळ जास्त असावा आणि मृत्यू हळूहळू तडपडून तडपडून व्हावा.

आता जेव्हा येशूला वदस्तंभावर खिळले गेले होते. खऱ्या भयानक गोष्टी आता सुरू होणार होत्या. हातांना जसे ठेवण्यात आले होते की, त्याचे हात डोक्याच्यावर रहावेत. शरीराचे सर्व ओझे हातात फसवलेल्या मोळयावर होता. हे तर स्पष्ट आहे की, अशा परिस्थितीत असहय वेदना होतात पण दुसरी गोष्ट ही की अशा परिस्थितीत श्‍वास सोडणे अगदी कठीण होते. श्‍वास घेण्यासाठी हे खूप गरजेचे होते की, पायात मारलेल्या मोळयावर भर देवून शरीराला वर केले जायचे. जेव्हा वेदना असहया व्हायच्या तेव्हा क्रूसावर लटकलेल्या व्यक्तींचा आपले सारे ओझे आपल्या हातावर पुन्हा टाकावे लागायचे. वेदनेचे एक भयानक चक्र सुरू होते. हातावर लटकणे, श्‍वास घेणे अवघड, श्‍वास घेण्यासाठी लवकर आपल्या पायाची मदत घेऊन वर उचलले जाणे आणि पुन्हा खाली लटकणे हे चालूच राहिले.

हे काम अधिकच अवघड होत गेले कारण येशूची चाळणी केलेली पाठ त्या वधस्तंभाला घासत होती. या सर्वामुळे स्नायू आकडू लागले आणि त्यामुळे श्‍वास सोडण्याचे काम अधिक कठीण झाले.

ह्याप्रकारे येशू काही तास असाच तडपडत राहिला आणि शेवटी एका मोठया स्वराने त्याने आपला प्राण सोडला.

मृत्यूचे कारण : येशूच्या मृत्यूला अनेक गोष्टी कारणीभूत होत्या. भिती आणि श्‍वास थांबल्याने अनेक लोकांचा वधस्तंभावर मृत्यू होतो, पण येशूच्या बाबतीत ह्रदय विकारणे मृत्यू संभावीत गोष्ट असती हे हयावरून म्हटले जावू शकते की, काही तासात एका मोठया स्वरात ओरडून थेट मृत्यू (पीलात येशूला मृत पाहून चकीत झाला.) एका घातक ह्रदय विकाराने ह्रदयाची नस फाटते हे त्याचेकारण असू शकते.

<u>भाल्याने घाव</u> : येशू आधीच मेला होता पण येशूच्या बरोबर लटकवलेल्या लोकांचे पाय मोडण्यात आले. (कारण त्यांचा मृत्यू लवकर व्हावा.) आपण हे ही वाचले आहे की, एका सैनिकाने भाल्याने त्याच्या पोटाजवळ छेद केला. योहानाच्या द्वारा उपयोग केलेला शब्द म्हणजे ह्दयाजवळ होता. त्या सैनिकाला असे वाटत असेल की, येशू खरोखर मेला असेल याची खात्री करायची असेल तर ती ह्दयाजवळची जागा योग्य आहे.

त्या जखमेमुळे रक्त आणि पाणी वाहू लागले. तो भाला पोटातून ह्दयापर्यंत पोहचला असावा. ह्दयाच्या चारी बाजूंना पसरलेल्या गाठी फुटल्याने त्यातून रक्त आणि पाणी वाहू लागले.

**<u>निष्कर्ष</u>** : वधस्तंभावर खिळलेले वर्णन ऐतिहासिक साक्ष आहे आणि आधुनिक चिकित्सा ज्ञान (विज्ञान) ही हे सिध्द करते की येशू वधस्तंभावर मेला.

# पाठ ८
# ''पश्चाताप''

उपयोग केलेली वचने

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | लूक १३:५ | ४. | २ करिंथ ७:१० | ७. | स्तोत्र ५१:१-१७ |
| २. | प्रेषित २६:२० | ५. | इफिस ४:२२-३२ | | |
| ३. | मत्तय ५:२८-३० | ६. | प्रेषित २:३८ | | |

उद्देश : अनुग्रहावर विश्वास केल्यानंतर पवित्र शास्त्राचे हे मानने आहे की, पापांच्या क्षमेसाठी बाप्तिस्मा आणि बाप्तिस्मासाठी पश्चाताप आवश्यक आहे.

(प्रेषित २:३६-३८) पश्चातापासाठी युनानी शब्द 'मॅटानोईआ' आहे. ज्याचा अर्थ कोणाचाही विचार किंवा उद्देश याला बदलणे.

प.प्र. आपण कसे आहात ? आपल्या पापांच्या कबूलीनंतर आपल्याला कसे वाटत आहे ? काय अजून काही आहे का की जे तुम्हांला कबूल करायचे आहे ?

नि. आज आपण पश्चाताप विषयी शिकणार आहोत. काय तुम्हांला अर्थ माहित आहे? याचा अर्थ आहे ''विचार किंवा उद्देशाला बदलणे'' हेच तुम्हांला पण करायला पाहिजे. फक्त पाप कबूल करणेच पुरेसे नाही तर आपल्या पापांपासून (विचार किंवा उद्देश ला बदलणे) पश्चाताप करणे महत्वाचे आहे. खूप लोकांना वाटते की, पश्चाताप की एक भावना (जाणीव) आहे. ते म्हणतात पश्चातापाचा अर्थ असा आहे की तुम्हाला आपल्या पापांची घृणा असायला पाहिजे. पण पवित्रशास्त्र या भावनेपेक्षा अधिक शिकवते. आज आपण शिकूया कि पवित्र शस्त्रानुसार योग्य पश्चाताप काय आहे.

१. **लूक १३:५**

परमेश्वर आपल्यासाठी फक्त दोनच निर्णय ठेवतो.

१. पश्चाताप किंवा २. नाश

२. **प्रेषित २६:२०**

अ. पौल जेथेपण गेला तेथे त्याने पश्चातापाचा प्रचार केला.

ब. खरा पश्चाताप फक्त पापांना सोडणे नाही तर परमेश्वराकडे वळायला ही पाहिजे.

क. आपल्या कामाद्वारे परमेश्वर व इतर लोक जाणतील की, आम्ही पश्चाताप केलेला आहे. (शब्दामध्ये,विचारामध्ये व कार्यामध्ये बदल)

३. **मत्तय ५:२८-३०**

अ. पापाकडे आपण असे बघायला पाहिजे की ते पाप आहे. पाप हे छोटे किंवा मोठे नसते. वासना पण व्याभिचारच आहे.

ब. आपण आपल्या पापांना कापायला पाहिजे. तुम्हाला तुमच्या पापाबद्दल घृणा असायला पाहिजे तरच तुम्ही बदलू शकता. का तुमच्या जीवनामध्ये आता सुध्दा असे कोणते पाप आहे का की ज्याची तुम्ही घृणा करत नाही ?

**महत्वाची सुचना** : जर कोणत्या पापाच्या प्रती तुम्ही आता सुध्दा आकर्षित असाल तर होऊ शकते की काही वेळासाठी तुम्ही ते पाप सोडाल पण परत तुम्ही पापामध्ये फसू शकता.

४. **२ करिंथ - ७:१०**

साधारणतः आपण कायम पापाची घृणा करतो. पवित्र शास्त्र सांगते की, पापाच्या प्रती आपली दोन प्रकारची इच्छा असू शकते.

१. परमेश्वराच्या भक्तीचा शोक ज्यामुळे आपण खरोखरच पापाची घृणा करतो आणि हा खरा सच्चा आणि कायमचा बदल घडवते आणि तुम्ही परत ते पाप करत नाही.

२.   जगिक इच्छेमुळे तुम्हाला पापांची घृणा वाटते पण तुम्ही बदलत नाही. तेच तुम्ही परत करता हे मरणाकडे (नर्काकडे) घेवून जाते.

उदाहरण :  तिकीटाशिवाय पकडले जाणे.

५.   **इफिस ४:२२-३२**

वचन विषेश करून हे सांगते की, आपण जुन्या मनुष्याला त्याच्या इच्छेपासून आणि उपयोगांपासून उतरवले पाहिजे. आपल्या जुन्या पापमय विचाराला आणि उपयोगांना उतरवणे हेच पुरेसे नाही.

आपल्याला नवीन मनुष्य परिधान करायला पाहिजे. दुसऱ्या शब्दामध्ये आपल्याला आपले जुन्या वाईट सवयीच्या जागी नवीन स्वभावाला स्विकारायला पाहिजे.

वाईट विचाराच्या जागी धार्मिक विचार (आपल्या मनाला नवीन बनवने.)

उदा. वचन २५,  खोटे बोलणे सोडून खरे बोलणे.

व.२८   चोरी करणे जुनी सवय सोडून त्यांच्या जागी काम करणे आणि गरजवंताना करणे.

व.२९  वाईट बोलणे सोडून असे  बोलले पाहिजे जेणेकरून दुसऱ्यांची उन्नती व मदत होईल.

व.३१-३२  कडूपण, संताप, क्रोध गलबला निंदा आणि वैरभावला काढून फेका आणि त्यांच्या जागी कृपा,करूणा आणि क्षमा यांना परिधान करा. हयाप्रकारे आपण बदलू शकतो. आता पश्चातापानंतर मला काय करायचे आहे ?

६.   **प्रेषित २:३८**

नि. पहिला पश्चाताप करा व नंतर बाप्तिस्मा घ्या तरच तुमच्या पापांची क्षमा होईल. काय तुम्ही त्यासाठी तयार आहात?

७. <u>स्तोत्रसहिंता ५१:१-१७</u>

ह्या पाठाच्या शेवटी ह्या स्त्रोताला प्रार्थने सारखे वाचा आणि शोधणाऱ्याला प्रोत्साहन दया कि दाविदासारखे आपल्या पापांच्यासाठी परमेश्वरासमोर प्रार्थना करावी या प्रार्थना करू.

पश्चातापचे काहि अजून पाठ

**लूक : १३:५ परमेश्वर आपल्याला फक्त दोनच निवड देतो.**

१. पश्चाताप  २. नाश स्वर्ग आणि नर्क या सारखे, तुम्ही अंधारात राहू शकता किंवा उजेडात ह्याशिवाय परमेश्वराकडे कोणती दुसरी जागा नाही. जर तुम्ही  पश्चाताप नाही केला तर नाश होईल तर कोणती निवड तुम्ही करणार ?

<u>पश्चाताप काय नाही आहे</u> ?

१. <u>फक्त दोषी पणाची जाणीव असणे म्हणजे नाही</u> - <u>प्रेषित २४:२५</u> फेलिक्सला दोषी आहे असे वाटले पण त्याने पश्चाताप केला नाही. आपल्या पापांमुळे आपल्या दोषीपणाची जाणीव होते हि जाणीव पश्चातापाच्या पहिला येते पण हा पश्चाताप नाही.

२. <u>आपल्या पापांसाठी फक्त वाईट वाटणे म्हणजे ही नाही.</u>

२- करिंथ ७:१०

✻ काही लोकांना आपल्या पापांबद्दल वाईट वाटते फक्त त्याच्या परिणामामुळे किंवा पकडले जाऊ यामुळे वाईट वाटते.

✻ काही लोकांना वाईट नक्की वाटते. पण त्यांच्या चुकीमुळे नव्हे तर त्यांनी जे केले त्यामध्ये पकडले गेल्यानंतर त्याच्या दंड भरावा लागेल त्यामुळे.

३. <u>एक चांगला व्यक्ती बनूनही नाही</u>  <u>यशया ६४:६</u>

✻ काही लोक आपल्या शक्तीवर विश्वास ठेवून स्वतःला बदलण्याचे प्रयत्न करतात.

✻ कोणत्याही एकटयाच्या प्रयत्नामध्ये एक स्वधार्मिकता असते जे ह्या गोष्टीला मानत नाहीत कि त्यांना परमेश्वराची व पापांपासून पश्चातापाची आवश्यकता आहे.

४. <u>फक्त धार्मिक बनने ही नाही लुक १८:९-१४</u>

✻ व्यावहारिक व स्वाभाविक दृष्टीने परूषी खूप धार्मिक होतो ते उपवास करत होते. प्रार्थना करत होते आणि धार्मिक मध्ये पण भाग घेत होते.

✻ आपला दश्मांश देत होते, पण कधी पश्चाताप करत नव्हते.

५. <u>फक्त सत्य जाणून घेणे म्हणजे ही नाही</u>.

<u>याकोब २:१९-२०</u>

✻ फक्त सत्याविषयी बौध्दिक ज्ञान असणे ही ह्या गोष्टीची खात्री नाही की सत्य हे कोणाच्या तरी जीवनाचे जिवंत सत्य बनले आहे.

✻ बुद्धीने विश्वास करणे व मनापासून विश्वास करणे ह्या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. <u>(रोम १०:९:१०)</u>

**योग्य पश्चाताप कोणता आहे ?**

१. आपल्या पापांसाठी परमेश्वराकडे क्षमा मागणे <u>स्तोत्र ५१:१-४, ३८:८</u>

योग्य पश्चाताप हा असा शोक आहे जो स्वतःसाठी किंवा दुसऱ्यासाठी नाही तर सगळ्यात पहिला परमेश्वरासाठी आहे.

२. आपल्या पापांच्या प्रति खुले असने <u>स्तोत्र ३२:५,</u>

<u>१ योहान १:९</u> ,<u>याकोब ५:६</u>

३. आपण पापी आहोत हे मानने <u>नीती २८:१३</u>

४. पापांबद्दल घृणा, <u>मत्तय : २९-३०</u>

५. शक्य असल्यास दुसऱ्यांकडून जे घेतले ते परत करणे. <u>लूक १९:८</u>

**पश्चाताप मध्ये काय असते ?**

१. पापापासून मन फिरवणे गलती ५:१९-२१, इफिस ३:४
जखऱ्या १:४

२. संसाराच्या जगिक गोष्टीपासून मन फिरवणे १ योहान २:१५ , याकोब ४:४

३. आपल्या इच्छेपांसून मन फिरवणे २ करिंथ ५:१५ , २ करिंथ १४:२०

४. परमेश्वराकडे वळणे प्रेषित २०:२१, २६:२०, जखऱ्या १:३

५. जुन्या मनुष्याला काढून नविन मनुष्य परिधान करणे.
इफिस ४:२२-३२ , कलस्सै ३:५-१४

**निष्कर्ष प्रेषित २:३८**

नि. पहिला पश्चाताप करा व बापिस्मा घ्या. तेव्हा तुमचे पाप क्षमा होतील काय तुम्ही ह्यासाठी तयार आहात?

* विशेष पापांपासून पश्चाताप करण्यामध्ये मदत करण्यासाठी काही उपयोगी वचने.
ह्या वचनाचा उपयोग फक्त विशेष पश्चातापासाठी करा. आपला उद्देश हा आहे की आपण त्यांना हे सांगू की कसे विशेष पापांमुळे दुसऱ्यांना व परमेश्वराला आपण दुःख देतो. ह्या पाठामध्ये त्यांना मदत करा हे जाणण्यासाठी कि कसे त्यांच्या पापांमुळे त्यांच्या चरित्रावर परिणाम झाला आणि त्यांना त्या चरित्रात बदलण्याचे आव्हान / बोध दया.

१. ते लोक जे पश्चातापाला स्विकारत नाहीत. रोम २:४

२. ते लोक जे संसारावर/जगावर प्रेम करतात. याकोब ४:४

३. ते लोक ज्यांना पैशांवर प्रेम आहे. लुक १६:१३-१५,
नीती १५:२७

४. क्षमा करणे कठीण मत्तय ६:१४-१५

५. गर्भपात यिर्मया १:५ स्तोत्र १३९:१३-१६

६. स्त्रियांचा लोभ, दुर्बल मन असणारी/चंचल स्त्री

२ तिमथ्यी ३:६-७ , इफिस ५:१५-१७

७. आळशी लोक जे काम करू इच्छित नाहीत.

२ थेस्सलनी ३:१०

८. लहान मुलांशी लैंगिक सम्बंध, मार्क ९:३६, ४२, लूक १७:१-२

९. समलैंगिकता १ करिंथ ६:९

१०. स्वधार्मिकता, दुसऱ्यांना खाली बघणे लुक १८:९-१४

११. घमण्ड फिलि २:३ , निती १३:१०

१२. स्वार्थ २ तिमथ्यी ३:१-५

१३. कडूपण इब्री १२:१५, कलस्सै ३:५-८

१४. विवाहमध्ये भांडणे कलस्सै ३:१८ , इफिस ५:२२-३१

१५. धोका, निती १५:४

१६. बॉय फ्रेन्ड, (प्रियकर) , गर्ल फ्रेंन्ड , (प्रियसी) बरोबर सम्बंध इफि ५:३

# पाठ क्र.९
# बाप्तिस्मा

<u>उपयोग केलेली वचने</u>

१. प्रेषित २:३६-४१ २. योहान ३:३-५ ३. मत्तय २८:१८-२०

४. रोमकरांस ६:३-७ ५. १ पेत्र ३:२०-२१ ६. प्रेषित ८:२६-३९

७. प्रेषित १६:१३-१५ ८. प्रेषित २२:१- १६

**<u>उद्देश्य</u>** - वधस्तंभाविषयी प्रचार केल्यानंतर पेत्राने लोकांना पांपाच्या श्रमेसाठी पश्चाताप करणे व बाप्तिस्मा घेण्यासाठी (प्रेषित २:३८) हा धडा येशुचे बलिदान आणि बाप्तिस्मा ह्यांच्याद्वारे आपल्या पापांची क्षमा हयामधील पैलू मजबूत करतो.

१. **<u>प्रेषित २:३६-४१</u>**

पेत्राने प्रचार केला कि सर्वानी हा विश्वास आणि येशुचं प्रभु आणि ख्रिस्त आहे हे स्विकारले पाहिजे.

प्रत्येकजण वैयक्तिकरित्या येशुचे वधस्तंभावरती जाण्यासाठी जबाबदार आहे. ह्या प्रचाराने लोकांच्या ह्द्याला भेटले आणि त्यांनी विचारले,''आम्ही काय करावे?'' पेत्राने उत्तर दिले कि सगळ्यात पहिल्यांदा <u>पश्चाताप</u> व <u>पापांच्या क्षमेसाठी</u> बाप्तिस्मा आणि पवित्र आत्म्याचे दान प्राप्त करा.

२. **<u>योहान ३:३-५</u>**

<u>प्र</u>. जर आपण स्वर्गात जाऊ इच्छितो तर येशुच्या नुसार काय व्हायला पाहिजे?

( आपल्याला परत जन्म घेतला पाहिजे. आपल्याला पाणी आणि आत्म्याने जन्म घेतला पाहिजे.)

<u>प्र</u>.पाणी आणि आत्म्याने आपण कधी जन्म घेतो ?

३. मत्तय २८ : १८-२०

प्र.कोणत्या प्रकारच्या लोकांना बाप्तिस्मा दिला पाहिजे? ( ते लोक जे एवढे वयस्कर असावेत कि त्याना ते सर्व जे येशूने आज्ञा दिली ती शिकवली जावे. ते त्या गोष्टी समजू शकतील आणि स्वीकारतील (व.२०) यामध्ये नवजात शिशु आणि मुले नाही येत.
आम्ही हे पण पाहतो की बाप्तिस्मा येशूची एक आज्ञा आहे.
आपल्याला त्याच्या आज्ञेचे पालन केले पाहिजे.

४. रोम ६:३-७

व.३-जेंव्हा आपण बाप्तिस्मा घेतो तेंव्हा आपण येशुच्या मृत्युमध्ये सहभागी होतो.

व.४-जेंव्हा आपण बाप्तिस्मा धेतो तेंव्हा आपण येशु बरोबर गाडले जातो. आपल्याला ह्यासाठी बाप्तिस्मा दिला जातो कि (व.४) आपण नविन जीवन जगावे.

व.६- जेंव्हा आपण बाप्तिस्मा घेतो. आपले जुने मनुष्यत्व येशु बरोबर वधस्तंभावर चढवले जाते.
व.७- जेंव्हा आपले जुने मनुष्यत्व मरते तेंव्हा आपल्या कशापासून स्वतंत्रता मिळते ? पापापासून.

आपण इथे पाहतो की, बाप्तिस्मा एक विश्वास आहे, ज्याच्याद्वारे आपण येशुचा मृत्यु, गाडले जाणे आणि पुनरूत्थान यामध्ये भाग घेतो. येशुचा भाग होण्यासाठी आपल्याला बाप्तिस्मा घेणे जरूरी आहे.

(जसे आपण इफिस १:७ मध्ये पाहतो, येशुचे रक्त आपल्याला वाचवते आणि रोम ६:३-४ हे दाखवते कि बाप्तिस्मा मध्ये विश्वासाच्या द्वारे आपण येशुच्या रक्ताचे आणि येशु बरोबर गाडले जाण्याशी संबंध ठेवतो.)

५. १ पेत्र ३:२०:२१
प्र. नोहाच्या वेळी किती लोक वाचवले गेले ? (8)

आठ लोक पाण्यापासून वाचवले गले. याचा अर्थ आहे ?

हे पाणी बाप्तिस्माचे चिन्ह आहे
ह्या पूराच्या पाण्याने नौका आणि
त्याच्या परिवाराला संसाराच्या
पापापासून वेगळे केले.

उत्पत्ती ६-४ - जग पापाने भरले होते. जसे पाण्याने जगाच्या पापापासून जहाजात होते त्या आठ लोकांना वेगळे केले. त्यासारखेच बाप्स्मिा आपल्याला आपल्या पापांपासून दूर करतो. हेच कारण आहे की पेत्र म्हणतो, पाणी ''बाप्तिस्माचे चिन्ह आहे जे आपल्याला सुद्‌धा वाचवते '' पुराचे पाणी बाप्तिस्माची चिन्ह / निशानी आहे. (त्याच्या विरूध्द नाही ) पवित्रशास्त्र कधीही बाप्तिस्म्याला चिन्ह /निशानी नाही सांगत.

प्र.वचन २१ नुसार बाप्तिस्मा काय करतो ? (आपल्याला वाचवतो) या आता आपण पवित्रशास्त्र मध्ये बाप्तिस्मा घेतलेल्या लोकांची उदाहरणे पाहुया.

६. प्रेषित ८ः २६ः१५

प्र परत घरी जातेवेळेस शोधणारा काय करत होता? (पवित्र शास्त्र वाचत होता)

प्र काय तो नम्रहिन होता की घमंडी?

नम्रहिन - कारण त्याने मदत मागितली व ३०-३१)

प्र तो शोधणारा एक चांगला धार्मिक व्यक्ती होता. पण नाही त्याला तारण मिळाले होते, नाही तो एक योग्य ख्रिस्ती होता. यामुळे त्यांनी त्या रथामध्ये एकत्र येऊन पवित्र शास्त्र शिकले, जसे की आपण काही दिवसापासून करत आलो आहोत. फिलिप्प ने त्याला येशुविषयी शुभवर्तमान सांगितले.

प्र येशुच्या विषयी काय शुभवतीमान आहे? तो आला लोकांची मदत केली, आपल्या पापांसाठी मेला, आणि परत उठला आणि ह्यामुळे आपणही वाचवले जावू शकतो.

प्रेषित ८:३६-३९- जेंव्हा त्यानी पाणी पाहिले, ते दोघे खाली गेले आणि ''पाण्यात उतरले''आणि फिल्लिपाने त्याला बाप्तिस्मा दिला (व.३८) पाण्यात पुर्णपणे बुडनेच हा बाप्तिस्मा किंवा, युनानी भाषेत ''बाप्तिस्मा'' चा असाच अर्थ आहे.

प्र  एथिओपिया पोहचेपर्यंत का त्या शोधणाऱ्याला थांबायचे नव्हते?
(कारण त्याला लगेचच क्षमा पाहिजे होती)
प्रेषित २ वरून आपण परत पाहतो कि बाप्तिस्मासाठी घाई आणि नंतर आनंद

७. प्रेषित १६: १३-१५ (स्त्रियांसाठी)
पौलाच्या प्रचार ऐकल्यानंतर त्यावर प्रतिक्रिया करण्यासाठी परमेश्वराने त्या स्त्रीचे मन उघडले.

प्र  त्या स्त्री ने प्रचाराच्या प्रति कोणती प्रतिक्रिया दाखवली.
(लगेच बाप्तिस्मा)

प्र  तुम्हाला काय वाटते, तीने का वाट पाहिली नाही?
(तिला तारण पाहिजे होते)

९. प्रेषित २२: १-१६ (सर्वांसाठी)

प्र  एक ख्रिस्ती बनण्याच्या अगोदर पौल कसा होता?
(मंडळीला त्रास देणारा, हिंसक व्यक्ती होता)

प्र  त्याला काय झाले (येशुने त्याला दर्शन दिले)

प्र  जेंव्हा तो येशुशी बोलला तेंव्हा काय त्याने त्याच्यावर विश्वास ठेवला? (होय)

प्र  पण काय त्याला तारण मिळाले होते ? (नाही)

प्र  पण काय त्याने येशूची आज्ञा मानली? (होय व १०-११ मध्ये पौल दिमिष्काला गेला.

प्र पण ह्यावेळेस तरी त्याला तारण मिळाले होते?(नाही)

**प्रेषित ९:९-१२** च्या नुसार पौलने तीन दिवसा पर्यंत काही खाल्ले नाही तो काही प्यायला नाही, तो फक्त प्रार्थने मध्ये होता.

प्र पण काय आता पण त्याला तारण मिळाले होते (नाही/ त्याचे पाप धुतले गेले नव्हते.)

प्र पौलाला कधी तारण मिळाले? (व.१६) (जेंव्हा त्याने बाप्तिस्मा घेतला)

प्र व.१६ नुसार बाप्तिस्म्याच्या उद्देश काय आहे ? (पापाला धुणे)

प्र काय हनन्याला वाटत होते कि पौलाने अजुन वाट पहावी?

(नाही व.१६ सांगते, ''तर आता उशीर का करतोस?)''

पुन्हा एकदा आपण पाहतो घाई मध्ये आणि आनंदामध्ये लगेच बाप्तिस्मा दिला गेला. (प्रेषित ९:१८)

प्र तुम्ही कशासाठी थांबला आहात? तुम्ही बाप्तिस्मा कधी घेणारा?

**निष्कर्ष** :-

प्र तुम्हाला काय वाटते कि तुम्हाला काय करायला पाहिजे ?

प्र तुम्ही बाप्तिस्मा कधी घेणार आहात?

प्र तुम्ही बाप्तिस्मा का घेणार आहात?

(तारण, क्षमेसाठी आणि पवित्र आत्म्याचे दान मिळण्यासाठी)

# येशू प्रभु आहे.
# धडा क्र.१०

<u>उपयोग केलेली वचने</u> :

१. प्रेषित ११:२५-२६ २. मार्क १२:२८-३१ ३. लुक ९:२३-२६
४. लुक ११: १-५ ५. लुक १४:२५-३३ ६. १ योहान २:३-६
७. योहान ८:३१-३२ ८. योहान १३:३४-३५ ९. मत्तय ७:२१-२३
१०. मार्क १:१६-२० ११. रोम १०:९-१३

<u>उद्देश</u> :

येशूला आपला प्रभु बनविणे याचा अर्थ काय आहे हे शिकवण्यासाठी बाप्तिस्मा घेते वेळेस आपण हे स्वीकारतो की, येशू माझा प्रभु आहे. या स्वीकाराचा अर्थ काय आहे ? याचा आपल्या जीवनावर व आपल्या जीवनातील केलेल्या निर्णयावर काय प्रभाव पडेल ? या पाठातून हे स्पष्ट होते की येशूच्या पाठीमागे चालण्याचा खरा अर्थ काय आहे ? तुम्ही एक अनुयायी (मागे चालणारे) आहात याचा अर्थ काय आहे ? जो त्याच्या मागे चालतात त्यांचे मन कसे असते ? कोणत्या प्रकारचे संकल्प दाखवणे गरजेचे आहे ? ज्याने येशूच्या मागे चालण्याचा निर्णय केला आहे त्याचे जीवन कसे असते ?

ख्रिस्तीयांसाठी : तुम्ही विचारू शकता की काय तुम्ही ख्रिस्ती आहात? तुम्हांला कोणती गोष्ट ख्रिस्ती बनवते ?(त्यांना उत्तर देऊ दया) आज आपण वचनाद्धारे शिकू शकतो की एका व्यक्तीला कोणती गोष्ट ख्रिस्ती बनवते. सर्वात पहिले आपण हे बघणार आहोत की, पवित्र शास्त्रात ‘‘ख्रिस्ती’’ या शब्दाचा सर्वात पहिला कुठे उपयोग केला गेला.

## १) <u>प्रेषित ११:२५:२६</u>

१. ‘‘शिष्य’’ या शब्दाला तुम्ही एक साध्या भाषेत, धार्मिक संबंध न लावता, त्याचे कशाप्रकारे विश्लेषण करू शकता ?

२. या वचनानुसार ‘‘शिष्य’’आणि ‘‘ख्रिस्ती’’ मध्ये काय फरक आहे ? काहीच नाही. या दोन्हींचा एकच अर्थ आहे.

**<u>शिष्य</u> = <u>ख्रिस्ती</u>**

३. तुम्हाला माहित आहे का, की नवीन करारात ‘‘ख्रिस्ती’’ शब्दाचा उपयोग किती वेळा केला आहे ?

(तीन वेळा प्रेषित ११:२६, २६:२८, १ ले पेत्र ४:१६)

४. किती वेळा ''शिष्य'' शब्दाचा उपयोग केला गेला? (२५० पेक्षा अधिक वेळा) या आपण काही वचने बघू. जे ''येशूच्या मागे'' चालण्याचे विश्लेषण करतात.

२. मार्क १२ः१८ः३१

१. दोन खूप महत्वाच्या आज्ञा आहेत. परमेश्वरावर प्रेम कर आणि आपल्यावर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर.

२. एक शिष्याच्या नात्याने आपल्याला पूर्ण मनाने परमेश्वराबरोबर प्रेमाचे नाते ठेवले पाहिजे आणि आपल्या शेजाऱ्याबद्दल प्रेम ठेवले पाहिजे.

३. ज्यावेळी आपण या दोन आज्ञांना समजतो त्यावेळी आपण हेही जाणतो की,येशूचे शिष्य बनण्यासाठी तो आपल्याकडून काय अपेक्षा करतो ?

३. लूक ९ः२३-२६

१. असे मन बनवण्यासाठी जोर दया जे येशूला पाहिजे आहे. हे वचन आपल्याला सांगते की, येशूच्या मागे चालणाऱ्यांकडून येशू काय अपेक्षा करत होते.

- स्वतःचा नकार
- रोज आपला वधस्तंभ घेऊन चालणे.
- येशूसाठी आपला प्राण द्यायला तयार असणे.
- येशू किंवा त्याच्या वचनांची लाज न धरणे.

२. शिष्यत्वाच्या या मागणी विषयी तुम्हांला काय वाटत ?

३. ''स्वतःचा नकार'' करणे याचा अर्थ काय आहे ? रोज आपला वधस्तंभ घेऊन चालणे याचा काय अर्थ ?

४. येशूच्या पाठीमागे चालण्यासाठी अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्यांना सोडणं तुमच्यासाठी कठीण जाईल ?

५. आपल्याला कशाप्रकारे येशू आणि त्याच्या वचनांची लाज वाटू शकते ?

४ <u>लूक ११:१-५</u>

१. येशूने आपल्या शिष्यांना प्रार्थना कशी करायची हे शिकवले. त्याने शिकवले की परमेश्वराला <u>''आपला पिता''</u> म्हणून बोलवलं पाहिजे.

२. एक शिष्य होण्याच्या नात्याने परमेश्वराबरोबर पित्याच्या रूपात एक वैयक्तीक नाते असले पाहिजे. आपण परमेश्वराबरोबर प्रार्थनेच्याद्वारे बोलू शकतो व वचनांच्याद्वारे त्याला ऐकून त्याच्याशी एक नात बनवू शकतो.

५ <u>लूक १४:२५-३३</u>

१. आपले जीवन आणि परिवाटिक संबंधापेक्षा जास्त आपल्याला येशूवर प्रेम केले पाहिजे. (याचा अर्थ असा नाही की आपण आपल्या आई-वडिलांचा आदर नाही करणे किंवा त्यांची सेवा न करणं)

२. आपला वधस्तंभ उचलण्याची इच्छा ठेवा आणि याच्या व्यतिरिक्त येशूच्या पाठीमागे चाला.

३. पाठीमागे चालण्याच्या अगोदरचं याची किंमत काय मोजावी लागेल हे जाणून घ्या. येशूच्या पाठीमागे चालणे ही एक गंभीर आणि आयुष्यभराचा निर्णय असायला पाहिजे ना कि भावनात्मक आणि काही वेळा पुरता.

४. सर्वाचा त्याग करण्याचा स्वभाव पाहिजे.

६ <u>१ ले योहान २:३-६</u>

१. हे वचन आपल्याला सांगते की,आपण कसे समजू शकतो की एखादी व्यक्ती शिष्य (ख्रिस्ती) आहे की नाही.

२. तो जो येशूला जाणतो त्याला त्यांच्या आज्ञा मानल्या पाहिजे. अन्यथा हा दावा चुकीचा आहे. (लूक ६:४६)

३. येशूच्या पाठीमागे चालणाऱ्याची ही खूण आहे की त्याने आपली रोजची वागणूक येशू सारखी ठेवावी.

७ <u>योहान ८:३१-३२</u>

१. एक शिष्य (ख्रिस्ती) होण्यासाठी फक्त विश्वास असणे पुरेसे नाहीये.

२. आज्ञा पालन (माझ्या वचनात टिकून रहा) शिष्य बनण्यासाठी अधिक आवश्यक आहे.

८ <u>योहान १३:३४-३५</u>

१. ही एक नवीन आज्ञा येशू आपल्याला देत आहे. कारण त्याची इच्छा आहे की, आपण त्यांच्या प्रेमाच्या उदाहरणावर चालावे.

२. येशूचे शिष्य होण्याचे एक चिन्ह प्रेम आहे. हरवलेल्यांवर इतके प्रेम कि, त्यांना शोधून त्यांना वाचवणे, माणसे पकडणारे बनणे, शिकणे, महानकार्य करण्यासाठी तयार (मत्तय २८:१८-२०, लूक १९:१० मार्क १:१६-२०)

✻ जे दिन आहेत त्यांच्यावर प्रेम (मत्तय २५:३२-४६)

✻ आपल्या परिवारांवर प्रेम (१ ले तिमथ्यी ५:८)

✻ मंडळीवर प्रेम (१ ले (पेत्र) १:२२, गलती ६:१०)

✻ आपल्या वैऱ्यावर प्रेम (मत्तय ५:४४)

९ <u>मत्तय ७.२१-२३</u>

१. येशूला प्रभु बनवने शब्दापेक्षा अधिक जास्त महत्वाचे मानले जाते.

२. धार्मिकतेत प्रभूला बोलवणं पुरे नाही, किंवा भविष्यवाणी करणे आणि चमत्कार करणे पण पुरेसे नाही आहे.

३. तारणासाठी आपल्याला परमेश्वराच्या इच्छेनुसार चालणे गरजेचे आहे.

४. जो पित्याची इच्छा पूर्ण करतो तोच स्वर्गाच्या राज्यात प्रवेश करू शकतो.

१० <u>मार्क २:१६-२०</u>

१. हे वचन सांगते की कसे येशूने आपले शिष्य शिमोन, अंद्रिया, याकोब आणि योहानाला बोलवले आणि कशी त्यांनी प्रतिक्रिया केली.

२. शिमोन आणि अंद्रिया याने कशी प्रतिक्रिया केली ? याकोब आणि येहानाने कशी प्रतिक्रिया केली ?

३. ''माझ्या मागे'' या येशूच्या अशा हाकेला तुम्ही काय प्रतिक्रिया कराल ?

४. ''माणसे पकडणारे'' याचा अर्थ काय आहे ?

११ <u>रोम १०:९-१३</u>

बाप्तिस्माच्या वेळेस आपण हे स्वीकारणार की ''येशू माझा प्रभु आहे''. ''येशू माझे प्रभु आहेत'' याचा स्विकार करण्याचा काय अर्थ आहे ?

अ. हा स्वीकार या गोष्टीची घोषणा करितो की, ''येशू ख्रिस्ताच्या प्रती आपण पूर्णपणे संकल्पित आणि लवलीन आहे''.

ब. याचा अर्थ आहे की, माझ्या इच्छेहून अधिक मी त्याच्या इच्छेला मानण्याचा निर्णय घेतला आहे.

क. याचा अर्थ आहे की, भलेही याची काहीही किंमत चुकवावी लागली तरी त्याच्या आज्ञा मानण्यास मी तयार आहे.

ड. फक्त तोंडाने स्वीकारणे पुरे नाही आपल्याला आपल्या मनापासून विश्वास ठेवला पाहिजे.

इ.	(२ तिमथ्यी २:१९-२१) येशूचा स्वीकार करण्याचा अर्थ आहे की एक व्यक्ती सर्व वाईट काम सोडून चांगले काम करणे.

<u>**निष्कर्ष**</u> :

येशूचे शिष्य बनने किंवा त्याला आपला प्रभु बनवण्याचा अर्थ आहे की, त्याच्या बरोबर एक प्रेमाचे आज्ञा पालनाचे आणि स्वतःला पूर्णपणे त्याच्यासाठी देण्याचे एक नातं बनवते. आपण प्रत्येक एका गोष्टीपेक्षा अधिक येशू बरोबर आपल्या नात्याला मानतो.

# मंडळी

## धडा क्र.११

उपयोग केलेली वचने :

१. कलस्से १:१८ | २. १ करिंथ १२:१२-२६ | ३. तिमथ्य ३:१५
४. इफिस २:१९-२२ | ५. इफिस ४:११-१६ | ६. इब्री १३:१७
७. इब्री ३:१२-१३ | ८. इब्री १०:२४-२५ | ९. प्रेषित २:४२
१०. कलस्से ३:१२-१७ | ११. मत्तय १८:१५-१७

उद्देश :

शोधणाऱ्याला या गोष्टीचे प्रोत्साहन दया की बाप्तिस्म्या नंतर स्वतःला वाचवण्यासाठी त्यांना एकटयाला सोडणार नाही याच्या व्यतिरिक्त येशू आपल्याला बाप्तिस्माच्याद्वारे एक शरीर म्हणजे मंडळीशी जोडतो. (१ ले करिंथ १२:१२-१३) जिथे एक समान विचार ठेवणारे शिष्यांचा असा गट आहे जो त्यांच्यात लवलीन राहतो हे भाऊ-बहिण परमेश्वराबरोबर चालण्यासाठी वारंवार तुम्हांला प्रोत्साहन देण्याचं एक निमित्त आहे.

मंडळीचा यूनानी शब्द आहे ''एक्लेसिया'' ज्याचा अर्थ आहे बोलावणे, एक सभा.

१ **कलस्सै १:१८**

अ. मंडळी ख्रिस्ताचे शरीर आहे.

ब. शरीराला मस्तकाची गरज असते ख्रिस्त मंडळीचे मस्तक आहे.

क. मंडळी आवश्यक आहे. एक व्यक्ती येशूला ''होय'' आणि त्याच्या मंडळीला ''नाही'' असे म्हणू शकत नाही.

२ **१ ले करिंथी १२:१२:२६**

अ. ते जे वाचवले गेले आहेत ते ख्रिस्ताच्या शरीराचे अवयव आहेत.

ब. एका आत्म्याच्याद्वारे त्यांच्या शरीरात आपल्याला बाप्तिस्मा दिला गेला आहे.

क. शरीरातील प्रत्येक एक अवयव महत्वपूर्ण आणि आवश्यक आहे.

ड. ख्रिस्ताच्या शरीरात कोणत्या वाटण्या नाही झाल्या पाहिजे.

इ. एकमेकांविषयी आपली स्वाभाविक जबाबदारी असली पाहिजे.

३. <u>१ तिमथ्यी ३:१५</u>

अ. मंडळी परमेश्वराचे घर (परिवार) आहे.

ब. मंडळीला सत्याचा पाया आणि मूळ आधार असला पाहिजे.

४. <u>इफिस २:१९-२२</u>

अ. परमेश्वराच्या मंडळीची निर्मिती येशूला कोनशीला बनवून केली आहे.

ब. प्रेषित आणि संदेष्टे याचा पाया आहेत.

क. सिध्दांतानुसार पवित्र शास्त्र मंडळीचा अधिकारी आहे.

५. <u>इफिस ४:११-१६</u>

अ. परमेश्वर मंडळीला अनेक पुढारी देतो जेणेकरून ते सेवेच्या कामासाठी इतर लोकांना तयार करतील.

ब. परमेश्वराची इच्छा ही आहे की त्याची मंडळी विश्वासात वाढावी आणि एकमत व्हावी.

क. ‘‘ ज्या वेळी प्रत्येक एक अवयव त्याचे काम करतात’’ तेव्हा मंडळी वाढते.

ड. आपल्या मंडळीला वाढवण्यासाठी परमेश्वर तुमचा कोणत्या प्रकारे उपयोग करू शकतो ?

६. <u>इब्री १३:१७.</u>

अ. मंडळीने पुढारी /लिडर निवडले आहेत आणि आपली जबाबदारी आहे की आपण त्याच्या अधिन असले पाहिजे.

७. <u>इब्री ३:१२-१३</u>

अ. आपल्याला हे लक्षात घेतले पाहिजे की आपले भाऊ बहिण धार्मिकतेमध्ये राहिले पाहिजे.

ब. यासाठी आपल्याला दररोज एकमेकांना प्रोत्साहन व बोध केला पाहिजे.

८. इब्री १०:२४-२५

अ. आपल्याला या गोष्टीवर विचार केला पाहिजे की कसे आपण एकमेकांना ख्रिस्तामध्ये प्रोत्साहन/वाढवू शकतो.

ब. एकत्र भेटण्याची सवय आपण सोडली नाही पाहीजे. (प्रेषित २:४२)

क. आपल्याला एकमेकांना प्रोत्साहन द्यायचे आहे.

९. प्रेषित २:४२

अ. पहिलाच्या शताब्दी मधील मंडळी, शिक्षणात, सहवासात, प्रार्थना करण्यात आणि भाकर मोडण्यात तप्तर होते. (त्यांच्यामध्ये नेहमी हया गोष्टीमध्ये स्थिरता होती) आणि त्यांच्या तत्परतेच आपल्याला अनुकरण करायचे आहे.

१०. कलस्सै ३:१२-१७

अ. करूणा चांगुलपणा, दीनता, नम्रता आणि सहनशीलता हे गुण परमेश्‍वराच्या मंडळीमध्ये नाते बनवून ठेवण्यासाठी आपल्याला हे गुण इतरांपेक्षा वेगळे बनवू शकतात.

ब. एकमेकांचे सहन करा व कोणतेही अपराध असतील तर क्षमा करा.

ड. आभारी रहा.

इ. एकमेकांना प्रोत्साहन द्या आणि शिकवा.

१० <u>मत्तय १८:१५-१७</u>

अ. येशू शिकवतो की कसे ख्रिस्ती लोकांनी आपले भांडण मंडळीत मिटवावे.

**निष्कर्ष :**

तुम्हाला परमेश्वराच्या मंडळीचा भाग बनवण्यासाठी परमेश्वराच्या योजनेला काय तुम्ही समजू शकत आहात ? त्याच्या मंडळीचा भाग होणे याचा अर्थ काय तुम्ही समजू शकत आहात ? परमेश्वराच्या मंडळीचा सदस्य या नात्याने कोणत्या रूपात तुम्ही तुमची जबाबदारी पूर्ण करू शकता ? मंडळीतील सभांना येणे/उपस्थित राहणे तुमच्यासाठी किती महत्वाचे आहे येत ?

# पाठ क्र.१२
# "<u>किंमत चुकवणे</u>"

<u>पुरूष आणि स्त्री</u>

प्र. तुम्ही एक ख्रिस्ती का बनू इच्छिता ?

प्र. तुम्हाला केव्हा ख्रिस्ती व्हायचे आहे?

प्र. एक व्यक्ती कसा ख्रिस्ती बनतो?

प्र. पश्चातापाचा अर्थ काय आहे ? काय तुम्ही पश्चाताप केला? केव्हा?

प्र. आपल्याला बाप्तिस्मा का घ्यायला पाहिजे ? बाप्तीस्मा याचा अर्थ काय आहे.

प्र. समजा एखादयाला पश्चाताप न करता बाप्तिस्मा दिला गेला तर तो ख्रिस्ती आहे का? आणि का नाही?

प्र. ख्रिस्ती बनण्यासाठी दुसरे पर्याय आहेत का ? ( उदा. लहानपणी बाप्तिस्मा करणे, दृढीकरण, हात डोक्यावर ठेवल्याने, आपल्या मनात येशूला प्रार्थना करणे?)

प्र. तुमच्या मंडळीच्या बाहेर असा कोणता ओळखीचा व्यक्ती आहे का जो ख्रिस्ती आहे ( परिवार, मित्र, धार्मिक लोक, जुनी मंडळी.)

नि. बदलले, परमेश्वरावर प्रेम करतात, फक्त यासाठी प्रामाणिक लोक ख्रिस्ती नाही म्हणवले जाऊ शकत. आज्ञा पालन करणे महत्वाचे आहे.

✻ <u>इब्री २:१</u>

नि. मंडळीपासून दूर जाण शक्य आहे, हा निर्णय पूर्ण जीवनाचा निर्णय आहे. मंडळी येशू ख्रिस्ताचे शरीर आहे आणि तुम्ही मंडळी सोडता तर परमेश्वराला सोडता असे आहे.

प्र. दुसरे लोकांनी जर मंडळी सोडली तर तुम्ही त्यावेळी काय करणार?

प. मंडळी सोडल्या नंतर तुम्ही स्वतःला वाचवण्यासाठी काय कराल? (काही गोष्टी इथे सांगितल्या आहेत ज्याकडे तुम्हाला लक्ष दयायचे आहे.)

१. **प्रार्थनेची वेळ**

प्र. आत्तापर्यंत तुमच पवित्र शास्त्र वाचन आणि प्रार्थना कशी होती? ( स्पष्ट उत्तर दया)

प्र. पवित्र शास्त्र वाचल्याने तुम्हाला काय अंतरज्ञान मिळते?

२. **मोकळेपण आणि पाप कबुली**

✻ **१ले योहान १:८-१०**

नि. मन मोकळेपणा आणि पाप कबुल करणे खूप महत्वाचे आहे. आपल्यातील कोणीच सिध्द नाही. जसं आपण विश्वासा बरोबर येशूच्या मागे चालतो. तर तो निरंतर आपल्या पापाची क्षमा करतो. पण आपल्याला मनमोकळे ठेवणे आणि पाप कबूल करणे खूप महत्वाचे आहे.

प्र. असे कोणते मुख्य पाप आहेत ज्याच्यात तुम्ही संघर्ष केला आहे?

प्र. भविष्यात या पापां पासून दूर राहण्यासाठी तुम्ही काय करणार?
(येशूने आपल्यासाठी वधस्तंभावर प्राण दिला ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवा)

प्र. मंडळीत असे कोण मित्र आहेत ज्यांना तुम्ही तुमचे पाप कबूल करू शकता?

३. **नम्रपणे मार्गदर्शन घेणे.**

✻ **इब्री १३:७.१७**

नि. नम्रपणे मार्गदर्शन घेणे खूप गरजेचे आहे. कोणी वैयक्तीक चुका सांगितल्या तरी तिथे नम्र राहीले पाहिजे.

प्र. एक शिष्य या नात्याने तुमची मोठी कमजोरी काय आहे? चर्चा करा.

४. **नाती**

प्र. बहीण-भावांबरोबर एक उत्तम नाते असले पाहिजे. त्यांच्या बरोबर चांगले नाते बनवले पाहिजे. (मंडळीत नाते पवित्र असले पाहिजे.)

५. **लग्न (२ करंथी ६:१४-१८, १ ले करंथी ७:३९, एज्रा १०:२, १०-११ काही निवडलेले परिच्छेद आहेत.**

प्र. एक ख्रिस्ती या नात्याने आपल्याला फक्त एका ख्रिस्ती व्यक्तीशीच लग्न केले पाहिजे असे का?

प्र. जर तुमचे घरातले तुमच लग्न दुसरीकडे ठरवत असतील तर तुम्ही काय करणार?

नि. काय तुम्ही तुमच्या प्रियकर/प्रियसीशी पुर्णपणे नाते तोडले आहे का? जर ते परत आले तर तुम्ही काय करणार ? त्यांच्या बद्दल तुम्हाला काय वाटते?

नि. ख्रिस्ती या नात्याने, आपण एक दुसऱ्याची पसंत जाणण्यासाठी एका गटात ( गुट मे ) भेटतो. याद्वारे मंडळीतील कोणा बहीण/भावा बरोबर लग्न करण्याची संधी मिळते. आपण कधीच मंडळीतील एकटे कोणत्या भाऊ/बहिणीला भेटत. नाही. आपण नेहमी सल्ला घेतो.

६. **विवाहीत लोकांसाठी.**

प्र. तुम्ही तुमच्या बायको/नवऱ्या विषयी काय विचार करता? तुमच्या नात्यामध्ये काय तुम्ही सल्ला घ्यायला तयार आहात का?

प्र. तुमच्या मुलांचे लग्न मंडळी मध्येच एका शिष्याबरोबर करणे याचे महत्व तुम्ही समजता का ?

प्र. जेव्हा तुमची मुले लग्नाच्या योग्यतेची होतील तेव्हा तुम्ही काय करणार ? जर तुमचे नातेवाईक तुमच्या मुलांसाठी कुठे बाहेर स्थळ शोधतायत तर तुम्ही काय करणार ?

७. **सताव/ छळ**

✲ **२ रे तीमथी ३:१२**

प्र. जेव्हा तुमचा छळ होईल तेव्हा तुम्ही काय कराल?
(ज्यांचा छळ झाला आहे त्याच उदाहरण दया)

प्र. काय तुम्ही तुमच्या सगळ्या पूर्वीच्या मुर्त्या पूजा-पाठ आणि रूढींना सोडले आहे का? हे सर्व करण्यामध्ये काय चुकीच आहे?

प्र. तुमच्या या बदलावर तुमच्या घरच्यांची काय प्रतिक्रिया आहे ? जर भविष्यात त्यांनी आणखी विरोध केला तर तुम्ही काय कराल ?

प्र. जर त्यांनी तुम्हाला मारलं, एका खोली मध्ये बंद केल किंवा सगळ्या परिवाराने मिळून विचार केला तर तुम्ही काय कराल ?

प्र. घरात तुमचं जीवन कसं चालू आहे ? काय घरातील कामात तुम्ही आपल्या परिवाराची मदत करत आहे का?

✻ संकल्प

प्र. काय तुम्ही मंडळीतील प्रत्येक सभेमध्ये येण्यासाठी तयार आहे का ? काय आपल्याला दुसऱ्या मंडळीत जायला पाहिजे का ? का नाही ?

प्र. ज्या शहरामध्ये मंडळी नाही आहे काय आपण त्या शहरात राहायला जावू शकतो का ? (आपली मंडळी मुंबई, दिल्ली, कलकत्ता, बेंगलोर, मद्रास, पुणे आणि कोचीन मध्ये आहे ).

प्र. काय तुम्ही शहरातून बाहेर जात आहात? किती वेळे साठी ?

प्र. एक ख्रिस्ती होण्याच्या नात्याने आपल्याला जास्त वेळेसाठी दुसऱ्या शहरात नाही राहायला पाहिजे. कारण आपण अशक्त होवून मंडळीपासून दूर होवू शकतो. खरं तर असं आहे कि अनेकांनी या कारणांमुळे मंडळी सोडून दिली आहे.

✻ काम/पैसा

नि. एक ख्रिस्ती असल्याच्या नात्याने आपल्याला प्रामाणिकपणाने काम केलं पाहिजे. प्रत्येक दिवस कामावर गेलं पाहिजे. कसरतीने काम केलं पाहीजे. वेळाने नाही गेलं पाहिजे, दुसऱ्यांची मदत केली पाहिजे तर परिक्षा असले तर मनं लावून अभ्यास केला पाहिजे. घरातील कामाला मदत केली पाहिजे.

प्र. तुम्ही कामावर कसे आहात? काय ते आपल्या खोटं बोलायला सांगत आहेत?

प्र. आपलं शिक्षण/अभ्यास कसं चालू आहे? काय त्यासाठी तुम्ही कष्ट व मेहनत घेत आहे?

प्र. काय आपण मंडळीला देण्यासाठी तयार आहे का? आपण आपल्या पगारातील १०% देतो. कारण पवित्र शास्त्र हेच उदाहरण आहे. (दशमांश =दहावा हिसा, मलाखी ३:८-१०)

**✻ मंडळीत सेवा करणे.**

प्र. यशूचे शिष्य बनण्यासाठी दुसऱ्यांनी आपली सेवा कशी केली? काय तुम्ही त्यांचे आभार मानले का ?

प्र. मंडळीमध्ये कोणत्या प्रकारे तुम्ही दुसऱ्यांची मदत करू शकता? आपल्याला कोणती जबाबदारी घेण्यासाठी आवडेल ?

नि. शेवटी मी आपल्याला एक चांगला ख्रिस्ती बनण्यासाठी सुचना देत आहे. हा एक आयुष्यभराचा एक निर्णय आहे. मला असं वाटत नाही की दोन महिने किंवा एक वर्ष नंतर आपण मंडळीतील सभेमध्ये येण्याचे बंद कराल आणि परत पापामध्ये पडाल. जर तुम्हाला तुमच्या निर्णयाबद्दल कुठली शंका किंवा अडचण आहे असं असेलं तर तुम्ही तुमचा पक्का निर्णय जो पर्यंत नाही बनवतं तोपर्यंत आम्ही थांबू शकतो.

# पाठ क्र.१३
# " पुनुरूत्थान "

आज आपण बघणार आहे की ख्रिस्ती पण तर्कासहित पुर्ण सत्य एक आहे. ह्यामध्ये आपण बायबलला परमेश्वराचे वचन म्हणून बघणार नाही. तर एक ऐतिहासिक पुस्तक म्हणून बघणार आहोत. जे येशूच्या मृत्यूनंतर २०-६० वर्षानंतर लिहले गेले. नवीन कराराचे ४०,०००च्या पण वरती अनेक हातांनी लिहलेली पत्रे आजपण अस्तित्वात आहेत आणि ते असे दर्शवतात की ते ५०-९५ ( ग्रि.पुर्व )च्या दशकात लिहलेले आहेत. ऐतिहासिक वचन जसे लूक ३ः१ आणि दुसरी वचने पुरातत्व विज्ञानाच्या द्वारे सिद्ध झालेल्या आहेत असे होवू शकतं की पवित्र शास्त्र एक खोटे किंवा पौराणिक कथा असेल. परंतु हे आपणास माहित आहे की हे येशूच्या काळात लिहले गेले.

१. **ख्रिस्ती जीवनाचा पाया : पुनुरूत्थान**

**१ करिंथी १५ः१२-१६**

प्र. येथे पुनरूत्थाना विषयी काय लिहले आहे ?

( ह्याच्याशिवाय आपला विश्वास व्यर्थ आहे, अजूनपर्यंत आपण पापात आहे. आपला प्रचार करणे पण व्यर्थ आहे.)

नि. पुनरूत्थानाच्या शिवाय ख्रिस्ती जीवन काहीच नाही, हा ऐतिहासिक धर्म आहे.

२. **भविष्यवाणी : प्रभू, खोटा किंवा मूर्ख ?**

**योहान २ः १८-२२**

निः तिसऱ्या दिवशी मी परत उठणार आहे असे येशू येथे भविष्यवाणी करतो. परंतू शिष्यांना मंदिराच्या इमारतीबद्दल येशू काही तरी बोलायला लागला असे वाटले.

मत्तय २६:५९-६१

निः इथे चुकून त्या तीन दिवसाची भविष्यवाणी केली होती ही एक सार्वजनीक घटना होती. ज्याच्या विषयी मत्तय खोटे बोलू शकत नव्हता. परंतु येशूची पुनरूत्थानाची भविष्यवाणी सगळ्यांना माहीत होती. (मत्तय १६:२१-२३)

मत्तय २७ :६१-६६

निः येशूची भविष्यवाणी अशी पसरली होती की,येशूच्या कबरीवरती लक्ष ठेवण्यात आले होते, एक ऐतिहासिक सत्य, मरियाने बघितले की येशूला कुठे गाडले गेले (वचन ६१) एका मोठ्या दगडाने कबरेला बंद केले होते. असा येशू एक गांधीजी नव्हता ते फक्त एक चांगले शिक्षक नव्हते.

३. त्यांचा मृत्यू

योहान १६:३१-३४

निः येशूला वधस्तंभावर अनेक पीडा दिल्या गेल्या. १९ व्या शतकात कोणीतरी असे सांगितले की येशू मेला नव्हता. इतिहास हे सांगतेच की, वधस्तंभावरच्या मरणाने कोणीही आजपर्यंत वाचले गेले नाही. इथे आपण बघतोय. येशू मेला की नाही हे बघण्यासाठी सैनिकांनी येशूच्या शरीरात भाला खूपसला होता. ते संपूर्ण माहिती असणारे लोक होते. त्यांना क्रूसावरच्या मरणाबद्दल माहीत होते. जेव्हा भाला खूपसला गेला तेव्हा येशूच्या शरीरातून रक्त व पाणी ( वचन ३४) ही एक वैदयकीय साक्ष आहे. ह्या गोष्टीची की हृदय फाटल्यामुळे हृद्याभोवती पाणी भरलेले होते. अर्थात तो मेला होता.

४. रिकामी कबर

मत्तय २८:११-१५

प्र. यहूदी आणि ख्रिस्ती कुठल्या गोष्टीवर सहमत होतो.

(येशूचे शरीर कबरीमधून गायब होते.)

निः कदाचित शिष्यांनी किंवा दुसऱ्यांनी ते चोरले असेल.

मत्तय २६:५६, ६६-७५

निः हे लक्षात घ्या की जेव्हा येशूला पकडण्यात आले. तेव्हा शिष्य कसे पळून गेले होते व पेत्राने त्याला नाकारले होते.

५. शरीराचे चोरी होणे

निः शिष्याने नाही जर दुसऱ्या कोणी ते शरीर चोरले असेल असा शिष्यांनी मुद्दाम असा अनुमान लावला. तेव्हा आपण त्यांच्या लेखणीला सत्य मानू शकतो पण बरोबर नाही.

लूक २४:३६-४५

निः अनुमान खरा नसतोय हा कोणता अनुमान नव्हता. जर शरीर चोरी झाले असते तर ते फक्त शिष्यानीच चोरले असते.

प्र लोक खोटे का बोलतात ( संकटातून वाचण्यासाठी, पैसे मिळवण्यासाठी व नाव कमवण्यासाठी इ.)

निः संकटास सामोरे जाण्यास लोक खोटे नाही बोलत. चला आपण शरीर चोरलेल्यां बद्दल जाणूया.

प्रेषित ४:३, १२-१३

निः घाबरलेला पेत्र ज्यांनी त्याला पकडले होते त्यांना तो सांगत होता की, परमेश्वराजवळ जाण्याचा एकच मार्ग आहे (वचन १२ ) पेत्र आणि योहान हे साधे असून सुद्धा ते स्वतःच्या साहसी वृत्तीबद्दल मानले जातात. (वचन १३ ) कोणत्यातरी गोष्टीने त्यांना बदलले होते?

निः जो या शिष्यांमध्ये सामील नव्हता तो म्हणजे पौल तर बघूया की त्याने काय लिहले आहे. दिमिष्कात जायच्यावेळी येशूचे दर्शन व्हायच्या आधी तो शिष्यांना सतावत होता. (प्रेषित ६,२२,२६ )

**१ करिंथी १५:३-८**

निः सगळ्यात महत्वाचे की, येशू आपल्या पापांसाठी मेला. समझा कोणी तुम्हांला मारून नंतर आईस्क्रीम दिले तर आपलं भांडण थांबेल? नाही. अशाप्रकारेच चांगली कामे आपल्या पापांची किंमत चुकवू शकत नाही. आपल्याला एक वाचवणाऱ्याची (तारणकर्त्याची) गरज आहे (वचन ३)

निः खूप जणांनी बघितले होते म्हणजे त्यांचा विश्वास होता. ५०० लोकांनी ते बघितले होते (वचन ६). हयाबद्दल पौल खोटे का बोलणार? फक्त काहीच लोकांना पुनुरूत्थीत येशूला बघितले हे म्हणणे सोपे आहे. ५०० लोकांनी बघितले असे म्हणून पौल तुमच्यासमोर एक आव्हान उभे करतोय. त्याने हे सांगितले कारण ते सत्य होते.

<u>निष्कर्ष</u> : प्रत्येक तर्कला हारवणारे सबूत आहेत. येशूचे शिष्य ऐतिहासिक खरेपणासाठी जगले किंवा मरण पावले असे नाही. कुठल्याही खोटेपणासाठी त्यांनी आपला प्राण नाही दिला. हे एक सत्य आहे. तर आता तुम्हीं या खरेपणास जाणून आहे तर ह्यामागे चालण्यास आपल्याला काय थांबवत आहेत? किंवा थांववू शकते?

प्र. ह्याबद्दल तुम्ही काय कराल ? आजपासून एका शिष्यासारखे जगा.

# धडा क्र.१४
# पवित्र आत्मा

<u>उपयोग केलेली वचने :</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रेषित २:३६-३८ | २. | योहान १६:७-८ |
| ३. | इफिसकटांस १:१३-१४ | ४. | इफिसकरांस ३:१६ |
| ५. | रोकमरांस पत्र ८:९, १५-१६ | ६. | रोमकरांस पत्र ८:२६-२७ |
| ७. | १ करिंथी ६:१९-२० | ८. | २ करिंथी ३:१७-१८ |
| ९. | गलतीकरांस पत्र ५:१६-१८,२२-२३ | | |

<u>उद्देश</u> :

शोधणाऱ्याला प्रोत्साहन दया की बाप्तिस्म्याच्या वेळेस निश्चित त्यांना परमेश्वरांच्या पवित्र आत्म्याचे दान मिळेल. बाप्तिस्मा झाल्यानंतर पवित्र आत्म्याच्या मदतीनेच आपण कायम राहतो. येशू मध्ये बाप्तिस्मा झालेल्या प्रत्येक शिष्याच्या जीवनात पवित्र आत्मा शक्तिशाली रूपाने काम करतो. आपण का पाठ ''मंडळी'' झाल्यानंतर ही शिकवू शकता. कारण दोन्ही पण आपणांस शेवटपर्यंत टिकण्यासाठी मदत करत असतात.

१. <u>प्रेषित २:३६-३८</u>

बाप्तिस्माच्या वेळी आपणांस पवित्र आत्म्याचे दान मिळते. पवित्र आत्मा एक दान आहे.

२. <u>योहान १६:७-८</u>

येशूने एका सहाय्यकाला पाठवण्याचे वचन दिले आहे. (<u>पवित्र आत्मा योहान १४:२६</u>) (यूनानी शब्द 'पॅराक्लेटोस' चा अर्थ आहे की, सहाय्यक, मदतनीस, आराम देणारा, वकील मध्यस्ती करणारा किंवा प्रोत्साहक)

आत्म्याला जगातले पाप, धार्मिकता आणि न्यायाने संकल्प देणे किंवा दोषी ठरवण्यासाठी पाठविले आहे. (ज्याच्यामध्ये आपणही आहोत.)

३. **इफिसकरांस १:१३-१४**

जेव्हा आपण ख्रिस्ती बनतो तेव्हा पवित्र आत्म्याचा शिक्का आपल्यावर लावला जातो. पवित्र आत्मा एक साठा/संचय आहे जो आपल्याला आपल्या तारणाची खात्री देतो.

४. **इफिसकरांस ३:१६**

पवित्र आत्म्याकडून मिळणाऱ्या शक्तीने आपण मजबूत बनतो.

५. **रोमकरांस ८:९, १५-१६**

जर आपल्यात पवित्र आत्मा नसेल तर आपला ख्रिस्ताशी काहीही संबंध नाही. (वचन ९)

आपणांस देवाची मुले व्हायचा आत्मा मिळाला आहे. (वचन १५-१६) आत्मा हे स्पष्ट करतोय किंवा साक्ष देतो की आपण परमेश्वराचे मुले आहोत.

६. **रोमकरांस पत्र ८ : २६-२७**

आपल्या अशक्तपणात आत्मा आपली मदत करतो. (मदतनीस) आत्मा आपल्यासाठी मध्यस्थी होती. (मध्यस्थी)

७. **१ करंथी ६ : १९-२०**

तुमचे शरीर पवित्र आत्म्याचे मंदीर आहे. पवित्र आत्मा तुमच्यात आहे. त्यामुळेच आपल्या शरीराद्वारे आपण परमेश्वराचा आदर केला पाहिजे.

८. **२ करिंथी ३:१७-१८**

खिस्ती सारखे जीवन जगण्यासाठी आत्मा आपल्यास मदत करतो. हे एक आयुष्यभर चालणारे कार्य आहे. दुसऱ्या शब्दात जसे जसे आत्मा आपल्यात कार्य करत जातो. तसे तसे आपण त्याच्यासारखे बनत जातो आणि त्याच्या गौरवाला अनेकवेळा दर्शवितो.

९. **गलतीकरांस पत्र ५: १६-१८, २२-२३**

आपल्याला आत्म्याच्या द्वारे चालले/जीवन जगायला पाहिजे. (वचन १६) आपल्याला त्याच्या म्हणजे आत्म्याने सांगितलेल्या मार्गावर चालले पाहिजे. (वचन १८)

जर आपण आपल्या पापी स्वभावावर नाही तर आत्म्याने सांगितलेल्या मार्गावर चाललो तर आपणांस आत्म्याची फळे मिळतील. जी की, प्रेम, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगूलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रीयदमन ही आहेत.
(वचन २२-२३)

आत्म्यामध्ये आपल्या जीवनामध्ये ही फळे घेवून यायला पाहिजे.

**निष्कर्ष** : आपल्याला पवित्र आत्म्यावर अवलंबून असले पाहिजे जो आपणांस बाप्तिस्माच्यावेळी परमेश्वराकडून लाभला आहे आणि आत्म्याच्या फळांना शोधायला पाहिजे.

✲ **दुसरे उपयोगी वचने** :

मत्तय १२:३१: आत्म्याची निंदा (वाईट बोलणे) करणे हे एक माफी न मिळण्याचे पाप आहे.

**प्रेषित १:८** : आत्म्याच्या द्वारे प्रेषितांना शक्ति मिळाली आणि ते शेवटपर्यंत एक साक्षी म्हणून राहिले.

<u>**प्रेषित ५:३**</u> : पवित्र आत्म्याबरोबर खोटे बोलले जाऊ शकते जसे हनन्याने केले.

<u>**प्रेषित ७ : ५१**</u> : आपण पवित्र आत्म्याला थांबवू शकतो.

<u>**१ करिंथी १२:१३**</u> : सगळयांना एका आत्म्याच्या द्वारे बाप्तिस्मा मिळाला आहे.

<u>**इफिसकरांस पत्र ४:३०**</u> : पवित्र आत्म्यास दुःखी करू नका.

<u>**इफिसकरांस पत्र ५:१८**</u> : आत्म्याने भरून रहा.

<u>**इफिसकरांस पत्र ६: १७-१८**</u> : वचन आत्म्याची तलवार आहे.

<u>**१ थेस्सलनी ५:१९**</u> : आत्म्यास विझवू नका.

<u>**१ थेस्सलनी २ :१३**</u> : परमेश्वराचे आपणांस निवडले कारण आपले तारण पवित्र आत्म्याच्या द्वारे व्हावे.

<u>**इब्री १०:२९**</u> : आपण पवित्र आत्म्याचा अनादर करू शकतो.

<u>**२ पेत्र १:२०-२१**</u> : वचनांची भविष्यवाणी जेव्हा झाली तेव्हा भक्त पवित्र आत्म्याच्या द्वारे उभारले गेले आणि परमेश्वराच्या द्वारे बोलत गेले.

# धडा क्र.१५
# महान कार्य

<u>उपयोग केलेली वचने</u>

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मत्तय ५:१४-१६ | २. | लुक १९:१० |
| ३. | १ तीमथ्य १-१५-१६ | ४. | १ तीमथ्य २:३ ते ४ |
| ५. | २ पेत्र ३:८-९ | ६. | मार्क १:१४-१८ |
| ७. | मत्तय २८:१८-२० | ८. | रोम १०:१२-१५ |
| ९. | प्रेषित ८:४ | १०. | प्रेषित ११:१९-२१ |

उद्देश - शिष्यांना येशूचे महत्वपूर्ण कार्य - हरवलेल्यांना शोधणे आणि त्यांना वाचवण्याविषयी सांगणे यासाठी की हे त्यांचेही कार्य बनावे हया आज्ञेला त्यांनी विश्वास करावा की सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य करावे.

१. **मत्तय ५:१४-१६**

येशूने आपल्या शिष्यांना शिकवले की त्यांना जगाचा प्रकाश बनायचे आहे त्याने त्यांना बोध केला की कधी त्या दिव्याला विझवू नका व लपवू नका परंतु त्या दिव्याला सर्व मनुष्यासमोर उघडे करा. तुमच्या बदलत्या जीवनामुळे येशूला हया जगात परमेश्वराने आणल्यामुळे त्यांची स्तुती व गौरव होईल.

उद्देश : तुमच्यासाठी ''येशूला वाटणे'' का महत्वपूर्ण आहे ?

२. **लुक १९ : १०**

येशू हरवलेल्यांना शोधण्यासाठी आला आहे. येशूचा उद्देश होता हरवलेल्यांना (जगाला) तारण मिळावे.

३. <u>१ तीमथ्य १:१५-१६</u>

येशू ह्या जगात पापी लोकांसाठी आला लक्षात ठेवा की, ह्या जगासाठी तुम्ही एक उदाहरण आहे. परमेश्वर कोणालाही वाचवू शकतो जर परमेश्वर तुम्हाला वाचवू शकतो तर तो कोणालाही वाचवू शकतो.

४. <u>१ तीमथ्य २:३-४</u>

परमेश्वराची इच्छा आहे की सर्व मनुष्याचे तारण व्हावे व त्यांनी सत्याला ओळखावे.

५. <u>२ पेत्र ३:८-९</u>

परमेश्वराची इच्छा आहे की, सर्व मनुष्यांनी पश्चात्ताप करावा. परमेश्वराचा धीर मनुष्याला पश्चाताप करण्याची संधी देतो. परमेश्वर न्यायाला वेळ लावतो कारण मनुष्याने पश्चाताप करावा.
<u>योजना बनवा</u> - <u>कसे आपण परमेश्वराच्या योजनेत योग्य ठरू शकतो</u> ?

६. <u>मार्क १:१४-१८</u>

येशू धार्मिक कार्याच्या सुरूवातीपासूनच लोकांना मनुष्य धरणारे बनावे यासाठी बोध करत आहे. ‘‘माझ्या मागे या मी तुम्हाला मनुष्य धरणारे बनवील’’. येशुने आपला उद्देश घेतला आणि मनुष्याला सोपवून दिला. त्यांची प्रतिक्रिया कशी होती? लगेच ते हयांना अनुसरले.

७. <u>मत्तय २८:१८-२०</u>

येशुने आपल्या शिष्यांना सर्व राष्ट्रातील लोकांना शिष्य बनवण्याच्या कार्यामध्ये कृतीशील राहण्याची आज्ञा दिली. ‘‘सगळया आज्ञा पाळा’’ ह्यामध्ये हेही येते की, त्याच्यामागे चालणाऱ्याने हे महान कार्य करण्याचीही आज्ञा पाळली पाहिजे. येशूची योजना होती वाढणे (गुणाकार) जे तुमच्यापासून सुरूवात होते.

कार्य/कृती : काय तुम्ही जाणून घेण्यासाठी तयार आहात ?

८. रोम १०:१२-१५

वचन सांगते की, जे कोणी येशूचे नांव घेतील त्यांचे तारण होईल.
पण विश्वास न करता लोकांचे तारण कसे होईल? न ऐकता ते कसे विश्वास करू शकतात ? जर कोणी प्रचारच नाही करणार तर ते कसे ऐकणार ? जर कोणाला प्रचार करायलाच पाठवले नाही तर तो कसा प्रचार करणार ? काय तुम्ही प्रचार करण्याची इच्छा ठेवता ? तुम्हाला परमेश्वराचे वचन लोकांपर्यंत नेण्याची इच्छा आहे ?

९. प्रेषित ८:४

सताव झालेले शिष्य जिकडेही गेले त्यांनी स्वतःहून प्रचार केला ते एक साधारण शिष्य होते ना की कोणत्या मंडळीचे प्रसिध्द शिष्य पुढारी तुम्ही काय करू इच्छिता ?

१०. प्रेषित ११:१९-२१

ते लोक सतावामुळे विखुरलेली होती. दूरपर्यंत प्रवास करून ती दुसऱ्या शहरापर्यंत गेली कारण तिकडच्याही लोकांनी येशूची सुवार्ता ऐकावी. परमेश्वराचा हात त्यांच्यावरही होता आणि खूप लोकांनी विश्वास आणिला.
तुम्ही काय करणार ? लोकांना येशची सुवार्ता ऐकवण्यासाठी एक योजना बनवा.

निष्कर्ष - एक ख्रिस्ती होण्याच्या नाते येशूचे महान धार्मिक कार्य सदैव आमच्या मनात असले पाहिजे. आतापर्यंत तुमच्याकडे कोणीतरी येत होते आणि आभार प्रदर्शन करण्यासाठी तुम्हालाही कोणाकडे तरी जावे लागेल. जेवढया जास्त लोकांना होईल तेवढया जास्त लोकांना आपल्या मित्रांना, नातेवाईकांना, आमच्या सोबत काम करणारे आणि महाविद्यालय/शाळेत शिकणाऱ्या मित्रांबरोबर आणि जे पण तुम्हांला भेटणार त्यांच्याबरोबर आपण विश्वास वाटला पाहिजे. प्रचार तुमच्या तारणाचे फळ आहे. जेव्हा तुमचे तारण होते तर तुम्हालाही  असेच वाटते की, तुमच्यासारखे इतर लोकांचेही तारण व्हावे. शोधणाऱ्याची मदत करावी कसे तो आपला परिवार, आपले मित्र व न ओळखीच्या लोकांबरोबर आपला विश्वास वाटू शकतो त्यांच्याबरोबर बाहेर जा व त्यांची मदत करा की माणसे धरणारे बना.